रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १२| पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १८ जून २०२४

किंमत ४ ₹


## जनावरांची कत्तल; आरोपींना अटक

**माणगाव :** तालुक्यात गोवंश प्राण्यांची बेकायदेशीररित्या कत्तल केल्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सविस्तर वृत्त असे की, दि. १७ जून रोजी दु. २ वाजताच्या सुमारास लोणशी मोहल्ला येथे आरोपी इम्तियाज गुलाम मोहोद्दीन पालेकर (५५), फुरकान सलीम खान (२३), सुभान सलीम खानदेशी (२२) सर्व रा. लोणशी मोहल्ला यांनी संगनमत करून जनावरांच्या गोठ्यामध्ये जनावरांची कत्तल करण्याकरिता कोणताही शासकीय परवाना नसताना लहान-मोठ्या चाकू व सुऱ्याने एका गोवंश प्राण्याची विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या कत्तल केली.यावेळी घटना स्थळावरून ५०/- रु. किमतीचा एक लाकडी मूठ असलेला पान २ वर

## जरांगेंचा सरकारला पुन्हा इशारा

**जालना :** मराठा नेते मनोज जरांगे यांनी आज पुन्हा राज्य सरकारला इशारा दिला आहे. मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला सगेसोयरेच्या मागणीसाठी १३ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे. आम्हाला हलक्यात घेतलं तर सरकारलाही कळेल, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. मनोज जरांगे यांनी यावेळी आपण राज्य सरकारच्या शिष्टमंडळावर पूर्णपणे विश्वास ठेवल्याचंदेखील म्हटलं आहे. आम्ही राज्य सरकारच्या भूमिकेकडे सकारात्मकतेने पाहात आहोत. मंत्री शंभूराजे देसाई आले. त्यांनी शब्द दिला. मी राजकारण नाही तर समाजाचं हित समोर ठेवून त्यांच्यावर विश्वास ठेवला आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आजचा अग्रलेख
विकासाची राम-कहाणी

### वेधक

### राहुल गांधींचे ठरलं!

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी केरळमधील वायनाड मतदारसंघाचा राजीनामा देणार असून, रायबरेलीचे खासदार राहतील. प्रियांका गांधी वायनाडमधून पोटनिवडणूक लढवणार आहेत. सोमवारी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या घरी काँग्रेस नेत्यांची बैठक झाली. त्यानंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला. या बैठकीला काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, खा. राहुल गांधी, सरचिटणीस प्रियांका गांधी आणि केसी वेणुगोपाल उपस्थित होते. यामध्ये लोकसभा अध्यक्ष आणि उपसभापती निवडणुकीचीही चर्चा झाली.



### शिवरायांची वाघनखं जुलैमध्ये भारतात

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या वाघनखांच्या मदतीने अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखं पुढल्या महिन्यात म्हणजेच दि. १ ते ७ जुलैच्यादरम्यान भारतात दाखल होणार आहेत, अशी माहिती सांस्कृतिक विभागाने दिली आहे. जुलैपासून पुढील दहा महिने म्हणजेच २०२५ च्या मे महिन्यापर्यंत ही वाघनखं या संग्रहालयात प्रदर्शनासाठी ठेवली जाणार आहेत. या वाघनखांच्या सुरक्षेसाठी विविध यंत्रणाही कामाला लागल्या आहेत. ही वाघनखं साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयामध्ये प्रदर्शनासाठी ठेवली जाणार आहेत. २०२३ मध्ये ब्रिटनच्या व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझियममधील ही वाघनखं मायदेशी परत आणण्यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली एक टीम २९ सप्टेंबरला लंडनला गेली होती.

### छत्तीसगडमध्ये सहा नक्षलवाद्यांचा खात्मा

**नवीदिल्ली :** छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यामध्ये नक्षलवादी आणि सुरक्षा दलाच्या जवानांमध्ये झालेल्या चकमकीमध्ये सहा नक्षलवाद्यांचा खातमा केल्याची माहिती सोमवारी पोलिसांनी दिली. दोन दिवसांपूर्वी ही चकमक झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या सर्वांवर मिळून सुमारे ४८ लाखांचे इनाम होते. हे सर्व नक्षलवादी पीपल लिबरेशन गुरिला आर्मीच्या (पीएलजीए) कंपनी-१ मधील होते. बस्तर रेंजचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी रविवारी पत्रकार परिषद घेत या कारवाईबाबत माहिती दिली. या चकमकीमध्ये पोलिसांच्या विशेष कृती दलातील एका कॉन्स्टेबल हौतात्म्य आले. नीतेश एक्का (वय २७) असे त्याचे नाव आहे. या चकमकीत दोन कॉन्स्टेबल जखमी झाले असून, त्यांना रायपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### कांचनजंगाचे डबे उडाले, मालगाडीची मागून धडक

# 15 जण ठार, 60 जखमी

## पायलटचे सिग्नलकडे दुर्लक्ष; भीषण अपघात ओढावला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग येथे सोमवारी (दि. १७) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास एका मालगाडीने कांचनजंगा एक्स्प्रेस (१३१७४)ला मागणून धडक दिली. या अपघातात कांचनजंगा एक्स्प्रेसच्या तीन डब्यांचे नुकसान झाले आहे. या भीषण अपघातामध्ये आतापर्यंत १५ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर ६० जण जखमी आहेत. दरम्यान, तात्काळ बचावकार्याला सुरुवात झाली असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. पान २ वर

पश्चिम बंगालमध्ये झालेला रेल्वेचा अपघात दुर्दैवी आहे. या अपघातात ज्यांच्या मृत्यू झाला, त्यांच्या कुटुंबियांप्रती मी संवेदना व्यक्त करतो. तसेच जे लोक जखमी झालेत, ते लवकरात लवकर बरे व्हावे, यासाठी प्रार्थना करतो.
– नरेंद मोदी,पंतप्रधान

या घटनेचे वृत्त ऐकून धक्का बसला आहे. या अपघातानंतर जिल्हाधिकारी, डॉक्टर आणि रुग्णवाहिका यांना तात्काळ घटनास्थळी दाखल होण्याच्या सूचना दिल्या आहेत.
– ममता बॅनर्जी, मुख्यमंत्री

### मृतांच्या वारसांना मदत

मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून देण्यात येणार असल्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर जाहीर केले. न्यू जलपाईगुडी येथे झालेला अपघात दुर्दैवी आहे. घटनास्थळी एनडीआरएफ आणि एसडीआरएफची टीम दाखल झाली असून, बचावकार्य सुरु आहे, अशी माहितीही त्यांनी दिली होती. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे ते म्हणाले.




### गरज सरो आणि वैद्य मरो

## निवृत्त शिक्षकांना नारळ

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेने नव्याने ७२१ उमेदवारांची शिक्षक म्हणून निवड केली असून, पैकी ६९१ जणांना विविध शाळांवर नियुक्ती दिली आहे. त्यामुळे आधी मानधनावर घेतलेल्या १६९ निवृत्त शिक्षकांना डच्चू दिला आहे. हे करताना संबंधिताना देण्यात आलेले पत्र २९ मे २०२४ रोजीच तयार होते, मग इतक्या उशिरा हे पत्र का दिले, असादेखील प्रश्न आहे. त्या शिक्षकांचे तीन महिन्यांचे मानधन कोणाच्या घशात गेले, हादेखील संशोधनाचा विषय आहे. 'गरज सरो आणि वैद्य मरो' या उक्तीप्रमाणे जरी प्रशासन वागले असले, तरी त्यांच्या

**१७ दिवस आधीच ऑर्डर तयार होती, मात्र १७ दिवसांनी हातात आली**

**रखडलेले मानधन कोणाच्या घशात?**

रखडलेल्या मानधनाबाबत प्रशासन काय भूमिका घेणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

जिल्ह्यातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भासत होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. यावर उपाययोजना म्हणून निवृत्त झालेल्या शिक्षकांवर पान २ वर

### प्रशासनाचे म्हणणे काय?

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निवृत्त शिक्षकांची तात्पुरती सेवा रद्द करण्याचे पत्र काढले आहे. रायगड जिल्ह्याला पवित्र प्रणालीद्वारे ७२१ शिक्षकांची निवड केली आहे, पैकी ६९१ शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली आहे. नवीन शैक्षणिक वर्षात शिक्षक मिळाले आहेत. त्यामुळे निवृत्त शिक्षकांची सेवा रद्द करण्यात आल्याचा पत्रात उल्लेख केला आहे.

## दत्त टेकडीवर अनधिकृत खोदकाम

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत हद्दीतील सुरई येथील दत्त मंदिर टेकडीवर सुरू केलेल्या खोदकाम व बांधकामास सुरई महिला ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला आहे. यावेळी मोठ्या संख्येन सुरई ग्रामस्थ, महिलांनी तूर्तास काम बंद करावे, अशी मागणी रेवदंडा पोलिसांकडे केली.

सुरई येथील दत्त मंदिर टेकडीवर ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता, शासकीय योजनेचे काम सुरू करण्यात आले आहे. तेथील ठेकेदारांनी या कामाबाबत कोणत्याही प्रकारची माहिती ग्रामस्थांना दिली नाही, त्यामुळे संप्तत महिलांनी टेकडीवर जाऊन काम थांबविले असून, पोलिसांना तूर्तास काम थांबवावे, अशी मागणी केली.



- **डोंगराला तडे जाऊन दरडीची भीती व्यक्त**
- **सुरई ग्रामस्थांची पोलिसांकडे तक्रार दाखल**

दत्त टेकडीवर सुरू करण्यात आलेल्या शासकीय कामाबाबत सुरई महिला व ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी रायगड, पोलीस अधीक्षक रायगड व सुरई दत्त टेकडी ट्रस्ट यांना निवेदन पत्र दिले आहे. यामध्ये म्हटले आहे की, सुरई गावास लागून असलेल्या दत्त मंदिर परिसरातील डोंगरावर काही अनधिकृत खोदकाम व बांधकाम सुरू आहे. यापूर्वीसुद्धा या कामाबाबत लेखी निवेदन अर्ज केले होते, त्यानुसार पान २ वर

## बाप रे! ४२२ जागांसाठी ३१ हजार अर्ज

### शुक्रवारपासून पोलीस भरतीला सुरुवात | मुलांची तयारी अंतिम टप्प्यात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बागळून ३१ हजार ६३ उमेदवारांनी भरतीसाठी अर्ज दाखल केले आहेत. रायगड पोलीस दलातील ४२२ जागांसाठी ही भरती होणार असून, शुक्रवारी (दि. २१) उमेदवारांच्या शारीरिक चाचणीने प्रत्यक्ष भरती प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. ऐन पावसाळ्यात ही भरती होणार असल्याने उमेदवारांसह पोलीस प्रशासनास ही प्रक्रिया सुरळीत पार पाडताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

मागील वर्षी डिसेंबर ते जानेवारी या कालावधीत २१८ जागांसाठी भरती झाली होती. यंदा ४२२ जागांसाठी भरती प्रक्रिया पार पडणार आहे. त्यामध्ये ३८२ पोलीस शिपाई, नऊ बॅन्ड्समन आणि ३१ पोलीस चालक या पदांचा समावेश आहे. पोलीस शिपाई, बॅन्ड्समन व चालक या पदासाठी एकूण ३१ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यात २६ हजार ६९ पुरुष व ४ हजार ९९४ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

भावी पोलिसांची पान २ वर



(छायाचित्र : समीर मालोदे)

### आमिष देणाऱ्यांवर राहणार नजर

पोलीस भरती प्रक्रिया निपक्षपातीपणे पार पाडण्यासाठी अडीचशेहून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या कालावधीत कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी प्रत्येकाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. कोणत्याही व्यक्तीकडून आमिष दाखवून पैशाची मागणी केल्यास उमेदवाराने थेट पोलीस अधीक्षक कार्यालय ०२१४१-२२८४७३ व ८६.५४९४७७२ या क्रमांकावर संपर्क साधावा व तक्रार नोंदवावी, असे आवाहन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले आहे.

## बँक लोन देण्याच्या नावाखाली फसवणूक

### अमर ग्लोबल मोबाईल शॉप व्यावसायिकाचा भांडाफोड

**। उरण । वार्ताहर ।**

सतीश गावंडच्या चिटफंड प्रकरणातून उरण परिसरातील जनता सावरत नाही, तोच उरण शहरातील अमर ग्लोबल मोबाईल शॉप येथील व्यावसायिकांनी ऑनलाइन मोबाईल खरेदी व बँकमधील लोन प्रकरणातून अनेक ग्राहकांना लाखोंचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात काही पीडित फसवणूकधारकांनी उरण पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला असल्याची माहिती अजय शिवकर या पीडिताने दिली आहे.

या प्रकरणात पीडित अजय शिवकर यांनी आपली कशा पद्धतीने फसवणूक झाली आहे ते सांगताना म्हटले आहे की, मला घरगुती खर्चासाठी पंधरा ते वीस हजारांची गरज होती. मी माझ्या मित्रांना लोनविषयी विचारले होते. अमर केंद्रेला माहिती होताच तो स्वतः माझ्याकडे येऊन त्याने मी हे काम करतो असे सांगितले. तसा तो माझ्या आधीपासून परिचयाचाच होता. त्याने सांगितले की मी पान २ वर






## विकटगड येथील ट्रेकर्स दरीत कोसळला

### रेस्क्यू टीमने सुखरूप बाहेर काढले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान डोंगरातील शिवकालीन विकटगड येथे ट्रेकिंगसाठी गेलेल्या पर्यटकांमधील एक महिला पर्यटक दरीमध्ये कोसळली. माथेरानमधील रेस्क्यू टीमने त्या १६ वर्षीय रिया साबळे पाय घसरून २०० फूट दरीत कोसळलेल्या ट्रेकर्सला जखमी अवस्थेत सुखरूप बाहेर काढले आहे.

विकटगड येथे ट्रेकिंगसाठी पर्यटक येत असतात. रविवारी ट्रेकिंगसाठी मोठ्या प्रमाणात ग्रुप आले होते. माथेरान येथे पेब किल्ला येथे खूप मोठ्या प्रमाणात पर्यटक ट्रेकिंगसाठी जात असतात. ट्रेकिंगसाठी आलेल्या पर्यटकांच्या ग्रुपमधील मुंबई अंधेरी येथील १६ वर्षीय रिया साबळे ही ट्रेकर्स आपल्या मित्रांसह विकटगड येथील विविध भागात पर्यटन करीत होते. दुपारी पुन्हा घरी परतण्यासाठी निघालेले पान २ वर

## एनडीआरएफचा पुन्हा तात्पुरता तळ

### केंद्र सरकारकडून ग्रीन सिग्नलची प्रतीक्षाच

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्ह्याला नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागते, विशेष करुन पावसाळ्यामध्ये आपत्तची टांगती तलवार कायम असते. बचावकार्यासाठी कायमस्वरुपी एनडीआरएफचा तळ उभारण्याला अद्यापही केंद्र सरकारकडून ग्रीन सिग्नलची प्रतीक्षा आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात तात्पुरत्या स्वरुपात पुन्हा राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक तैनात झाले आहे.

महाडमध्ये दाखल झालेल्या पथकामध्ये तीस जवानांचा समावेश असून, पथकाचे नेतृत्व निरीक्षक दिलीपकुमार यांच्याकडे आहे. मदत आणि बचावकार्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व यंत्रणा आणि साहित्याने हे पथक सुसज्ज आहे. पावसाळ्यात महाड आणि पोलादपूर या दोन तालुक्यांवर दरडी कोसळणे, महापूर अशा नैसगिक आपत्तीचे भय असते. अशा घटना घडल्यास तात्काळ घटनास्थळी पान २ वर



### गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी सीसीटीव्हींचे जाळे

# जिल्हाभर 'एक कॅमेरा सुरक्षेसाठी'



**। प्रमोद जाधव ।**
**। अलिबाग ।**

रायगड जिल्ह्यातील अनेक गुन्ह्यांची उकल सीसीटीव्हीच्या मदतीने मोठ्या प्रमाणात झाली आहे. या तिसऱ्या डोळ्याची अधिक मदत घेऊन जिल्ह्यातील महिला, नागरिक व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी एक पाऊल पुढे टाकले आहे. 'एक कॅमेरा सुरक्षेसाठी' ही संकल्पना लवकरच अंमलात आणून जिल्ह्यातील बाजारपेठांसह गर्दीच्या ठिकाणांवर प्रत्येकाच्या संशयित हालचालीवर लक्ष ठेवले जाणार आहे.

रायगड पोलीस दलाच्या अखत्यारीत पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांसह २८ पोलीस ठाणी आहेत. जिल्ह्यात एक हजार ८०० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. या पोलिसांच्या मदतीने जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच जिल्ह्यातील लाखो नागरिकांच्या सुरक्षेकडे लक्ष ठेवण्याचे काम केले जाते. त्यात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रशासकीय कामांव्यतिरिक्त अनेक गुन्ह्यांची उकलही पोलिसांमार्फत केली जाते. गुन्ह्यांची उकल करताना पोलिसांना वेगवेगळ्या माध्यमांचा आधार घ्यावा लागतो. त्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज मोठ्या प्रमाणात होते. जिल्ह्यातील अनेक गुन्ह्यांची उकल सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून झाली असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. याच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे जिल्ह्यातील अनेक भागात पसरवून गुन्हेगारी व काही अनुचित प्रकार रोखण्याचा प्रयत्न रायगड पोलीस दलामार्फत केला जाणार आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या संकल्पनेतून 'एक कॅमेरा सुरक्षेसाठी' हे अभियान राबविले जाणार आहे. जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील बाजारपेठांसह अन्य गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. रस्त्यावरील प्रत्येक हालचालीवर कॅमेरातून लक्ष ठेवले जाणार आहे.

### पोलीस अधिकाऱ्यांना सूचना

जिल्ह्यात गर्दीचा फायदा घेऊन पाकीटमार, महिलांची छेडछाड करणाऱ्यांबरोबरच दुकान व घरफोडी करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जिल्ह्यात एक हजार नवे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा उद्देश आहे. सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याबाबत पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे लवकरच जिल्ह्यात सीसीटीव्हीचे जाळे अधिक पसरणार आहेत.

वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल सीसीटीव्हीतून मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे बाजारपेठांमध्ये दुकानाबाहेर रस्त्यावरील हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी एक कॅमेरा बसविण्याचा प्रयत्न आहे. पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. यातून महिला सुरक्षेबरोबरच अन्य गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.
– सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड



## शहरात ७८ इमारती धोकादायक

**। उरण । वार्ताहर ।**

पावसाळ्यात जीर्ण झालेली इमारत, घर पडून जीवित आणि वित्तहानी होऊ नये यासाठी उरण नगरपालिकेने आपल्या परिसरातील धोकादायक इमारतींचा सर्व्हे सुरू केला आहे. या सर्व्हेमध्ये शहरातील ७८ इमारती धोकादायक असल्याची माहिती समोर आली आहे.

शहरातील धोकादायक इमारतींना उरण नगरपालिकेने नोटीसा बजावण्याचे काम केले आहे, अशी माहिती उरण नगरपालिकेच्या सूत्रांनी दिली. यामध्ये चार इमारती या शासकीय इमारती असून, त्या धोकादायक आहेत. मात्र, काही धोकादायक इमारतींमध्ये रहिवासी आजही वास्तव्य करत असून, काही व्यावसायिकांनी आपला व्यवसाय थाटून ग्राहकांच्या जीवाशी खेळ मांडला असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



पावसाळ्यात जीर्ण झालेल्या इमारती दरवर्षी पडण्याच्या दुर्घटना घडत असतात. त्या अपघातात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे अशा प्रकारची दुर्घटना उरण शहरात घडू नये यासाठी यावर्षी धोकादायक इमारतींचा सर्व्हे करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना दिले होते. त्यांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालामध्ये उरण शहरात ७८ इमारती धोकादायक असल्याचे पुढे आले आहे. अशा धोकादायक इमारती पावसाळ्यात पडून एखादी जीवितहानी होऊ शकते. याचे गांभीर्य ओळखून उरण नगरपालिकेनी संबंधित इमारत, घर मालकांना नोटीसा बजावण्याचे काम केले आहे. तसेच संबंधित इमारतीतील नागरिकांना नोटीसा दिल्या असून, त्यांना इमारती खाली करण्यास सांगितले पान २ वर

- **धोकादायक इमारतींमध्ये थाटला व्यवसाय**
- **चार शासकीय इमारतींचा समावेश**

# बजरंग बप्पांच्या विजयात अनेक किंगमेकर

## ■ चर्चा मात्र शेकापच्या भाई मोहन गुंड यांची

**। केज । प्रतिनिधी ।**

**बीड लोकसभेचा निकाल लागला असून, बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयामध्ये जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते, नेते यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. खरं तर, ही निवडणूकच लोकांनीच हातात घेतली गेली होती, निवडणुकीत प्रत्येक माणसात वावरणारा माणूस महत्त्वाचा असतो. मात्र यात काही असे चेहरे होते, त्यांनी पडद्यामागे खूप काम केले. आमदार संदीप क्षीरसागर सोडले तर, महाविकास आघाडीत एकही दिग्गज नेता बजरंग सोनवणे यांच्यासोबत नसतानादेखील विजय मिळवता आला म्हणजे मराठा, मुस्लिम, बौद्ध समाजाची एकी भाजपवर नाराज असलेल्या सर्वच घटकातील लोकांनी विजय मिळवून दिला हे सत्य कोणाला नाकारता येणार नाही.**



बीड जिल्ह्यामध्ये बजरंग सोनवणे यांच्या निवडणुकीत असाच एक चेहरा होता, एकाच पक्षात निष्ठेने २० वर्षे काम करणारे व्यक्तिमत्व म्हणजे शेकापचे भाई मोहन गुंड. भाईंचे अनेक चळवळीतील लोकांशी असलेले मैत्रीपूर्ण संबंध, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अनेक यशस्वी आंदोलनाचे रेकॉर्ड त्यांच्या नावावर आहेत. कापूस, ऊस, पीक विमा, पीक कर्ज, कर्जमाफी अशा अनेक प्रश्नांवर जिल्हाभरात खूप काम केले आहे. शेतकरी कृषी कायद्याच्या विरोधात तर जिल्ह्यातील बैलगाडी मोर्चाने जिल्ह्यात रान पेटवले. २०१० मध्ये राष्ट्रपतींच्या गाडीखाली ऊस बिलासाठी उडी घेईन म्हणून उमरीच्या विखे पाटील कारखान्याला ४ कोटी रुपये शेतकऱ्यांना द्यायला भाग पाडले. शंभू महादेव साखर कारखान्याचा लिलाव करून शेतकऱ्यांना जवळपास १० कोटी रुपये मिळवून दिले. शेतकऱ्यांचा कुठलाही विषय असो, भाई गुंड रस्त्यावर काहीच राजकीय आधार नसलेला

> **ही निवडणूकच खूप अटीतटीची ग्रामपंचायतीप्रमाणे झाली. भाजपवर समाजात रोष होता. शेतकरी विरोधी कायदे, मराठा आंदोलन, संविधान बदलण्याची भाषा, मुस्लिम विरोधी भूमिका, यामुळे महाविकास आघाडीला मतदान करण्यासाठी लोक आतुरलेले होते. जिल्ह्यात खूप स्वाभिमानी लोक आहेत, बप्पाच्या जवळ मोठे नेते नव्हते म्हणून माझ्यासारख्यावर लोकांत पोहोचणे ही जबाबदारी होती. शब्द दिलेल्या लोकांची आशा आम्ही भंग होऊ देणार नाहीत, जनतेच्या कामी येऊ.**
>
> 
>
> **– भाई मोहन गुंड, शेकाप नेते**

कार्यकर्ता मात्र लढताना अनेक वर्षे लोक बघत आहेत.

शेतकरी कामगारांसाठी संघर्ष करणारा भाई मोहन गुंड हे मित्र पक्ष म्हणून भिंगरी लावून जिल्ह्यात फिरताना दिसले. प्रचारात सारीकाताई सोणवणे यांच्यासोबत भाईंची पत्नी शिवकन्या गुंड या पूर्ण निवडनुकीत परिवार म्हणून सोबत होत्या.

बीड जिल्हा हा फुले, शाहू, आंबेडकर यांचा वारसा जपणारा जिल्हा आहे. पूर्वी क्रांतीसिंह नाना पाटील, कॉम्रेड गंगाधर आप्पा बुरांडे, बबनराव ढाकणे हे डाव्या पक्षाचे खासदार राहिले. आज गढूळ राजकारण असलं तरी डावे पक्ष इथे तग धरुन आहेत. अनेक ग्रामपंचायतीत सत्ता आहे. अनेक वेळा पुरोगामी म्हणवून फक्त निवडणुकीपुरता वापर होतो म्हणून अनेकांची नाराजी होती. मात्र विचार ठाम असणारे डावे यावेळी प्रचारात आघाडीवर होते. यात कॉ. अजय बुरांडे, कॉम्रेड नामदेव चव्हाण, कॉ. भाऊराव प्रभाळे, दत्ता डाके, ॲड. भाई नारायण गोले, कॉ. मोहन जाधव असे अनेक रस्त्यावरचे चेहरे होते.

बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी भाई मोहन गुंड यांनी स्वतः अहोरात्र जिल्ह्यातील गावागावात जाऊन संवाद साधत मोट बांधली. जिल्हाभरातील शेकापसह मित्रपक्षांची ताकद बजरंग बप्पाच्या पाठीशी उभी करण्यात भाई मोहन गुंड यशस्वी ठरले असल्याची चर्चा आहे. विजयाचे किंगमेकर खूप असले तरी ग्राऊंडवर मात्र भाई मोहन गुंड हा कार्यकर्ता जिल्हाभर बप्पाच्या कामी आला असल्याची चर्चा जिल्हाभरात आहे.

# कत्तलीसाठी आणलेल्या जनावरांची सुटका

## ईद सणाला पोलिसांची दामत गावात धाड



**। नेरळ । वार्ताहर ।**

दामत गावात कत्तलीसाठी आणलेल्या गोवंशीय जनावरांची गोरक्षकांच्या पाठपुराव्यामुळे सुरक्षित सुटका करण्यात आली. नेरळ पोलिसांनी रात्रीच्या सुमारास दामत गावात धाड टाकून या जनावरांची सुटका केली आहे. दरम्यान, ईदच्या आदल्या दिवशी दामत गावात पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे गोवंशीय जनावरांचे प्राण वाचल्याने पोलिसांचे आणि गोरक्षकप्रेमींचे कौतुक होत आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ दामत गावात ईद सणानिमित्त मोठ्या प्रमाणात गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी आणल्याची माहिती गोरक्ष प्रेमींना मिळाली होती. त्यामुळे गोरक्ष तरुणांनी नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेत नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांना घेराव घातला. यावेळी पोलीस अधिकारी ढवळे यांना माहिती देत त्या गोवंशीय जनावरांची सुखरूप सुटका करण्यात यावी म्हणून मागणी लावून धरली होती. अखेर शिवाजी ढवळे यांनी आपल्या पोलीस सहकाऱ्यांच्या मदतीने ईद सणाच्या आदल्या दिवशी म्हणजेच रविवार १६ जून रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास दामत गावात धाड टाकली. यावेळी दहा गोवंशीय जनावरे पोलिसांनी ताब्यात घेत त्यांची सुखरूप सुटका केली आहे. सोमवारी दुसऱ्या दिवशी ईद सणाला कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दामत गावात पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# माँसाहेबांच्या रथयात्रेचे पाचाडच्या समाधीस्थळी उत्साहात स्वागत

**। पोलादपूर । वार्ताहर ।**



■ माँसाहेबांच्या समाधीस्थळी नतमस्तक होताना ॲड. रणजितसिंह जाधवराव आणि अश्विनीराजे जाधवराव (छायाचित्र : शैलेश पालकर)

१४ जून रोजी मातृतिर्थ सिंदखेडराजा येथून प्रस्थान झालेल्या राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या रथयात्रेचे शिवराजधानी रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथील समाधीस्थळी स्वागत करण्यात आले. राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या ३५० व्या पुण्यतिथीनिमित्त नवयुग विद्यापीठ ट्रस्टचे चेअरमन ॲड. रणजितसिंह जाधवराव आणि अश्विनीराजे जाधवराव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा स्वागताचा कार्यक्रम झाला.

यदूकुलभूषण राजे लखोजीराव जाधवराव प्रतिष्ठान सिंदखेडराजा तथा समस्त राजे जाधवराव परिवारातर्फे आयोजित करण्यात आलेल्या रथयात्रेचे प्रस्थान मराठा सेवा संघाचे अध्यक्ष पुरूषोत्तम खेडेकर, खा. प्रतापराव जाधव, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, बालाजी देवस्थानचे विश्वस्त राजे विजयसिंह जाधवराव, सिंदखेडराजाचे माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, माजी आमदार डॉ. तोताराम कायंदे, सिंदखेडराजाचे माजी नगराध्यक्ष सतीश तायडे, सिंदखेडराजाचे माजी नगराध्यक्ष ॲड. नाझीर काझी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यानंतर ही रथयात्रा जालना, घनसावंगी, बार्शी रोड बीड, पाटोदा, कर्जत जामखेड, बारामती, माळेगाव, वडगांव निंबाळकर, भुईंज, ओझर्डे, वाई, प्रतापगड, पोलादपूर व महाडमार्गे राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या ३५० व्या पुण्यतिथीदिनी सोमवार, दि. १७ जून रोजी पाचाड येथे पोहोचली. सकाळी साडेसात वाजता राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या समाधीस्थळी पाच विहिरींच्या पाण्याने समाधीला जलाभिषेक करण्यात आला. यावेळी ॲड. रणजितसिंह जाधवराव आणि अश्विनीराजे जाधवराव यांच्या प्रमुख उपस्थितीत रथयात्रेच्या सांगतेसोबत जिजाऊ माँसाहेबांच्या विचारांची ज्योत प्रज्ज्वलित करण्यात आली.

याप्रसंगी विविध मान्यवरांकडून राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे राष्ट्रविषयक विचारांचे प्रवर्तन करण्यात आले.

# अलिबागमध्ये आज मसाज केंद्राचे उद्घाटन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नॅशनल असोसिएशन फॉर दि. ब्लाईंड व नॅब रायगड मसाज सेंटर अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमध्ये दृष्टिहीन महिलांसह पुरुषांसाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने मसाज करण्यात येणार आहे. या मसाज केंद्राचे उद्घाटन मंगळवारी (दि. १८) सकाळी अकरा वाजता आरसीएफ वसाहत बी. १२/३ येथे होणार असल्याची माहिती संचालिका वृंदा थत्ते यांनी दिली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून रायगड जिल्हा परिषद समाजकल्याण अधिकारी डॉ. शाम कदम, आरसीएफ कार्यकारी संचालक अनिरुध्द खाडीलकर, महसूल विभागाचे तहसीलदार चंद्रसेन पवार, डॉ. शुभदा कुडतडकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दृष्टीहीन महिला व पुरुषांमध्ये एकाग्रता निर्माण करणे, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, स्वावलंबी बनविणे हा उद्देश समोर ठेवून हे केंद्र सुरू केले जाणार आहे.

# खालापुरात आदिवासींना जातीच्या दाखल्यांचे वाटप

## ■ टाटा स्टील फाऊंडेशन आणि उरण सामाजिक संस्थेचा पुढाकार

**। उरण । वार्ताहर ।**



कोकण विभागीय आयुक्त पी. वेलरासु, जिल्हाधिकारी किसन जावळे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपविभागीय अधिकारी कर्जत अजित नैराळे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, तहसीलदार खालापूर आयुब तांबोळी, मंडळ अधिकारी पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्यातील नावंढे वाडी, घोडीवळी वाडी, हाल वाडी येथील कातकरी जमातीतील लोकांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले.

टाटा स्टील फाऊंडेशनच्या वतीने पहचान प्रकल्पांतर्गत खालापूर तालुक्यातील आदिवासी वाड्यांवर जातीचे दाखल्यांचे कॅम्प आयोजित करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये वाड्या वस्त्यांवरील कातकरी समाजातील लोकांचे जातीच्या दाखल्यासाठी अर्ज तयार करण्याचे काम उरण सामाजिक संस्थेने केले. त्यास महसूल विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहकार्य केले. टाटा स्टील फाऊंडेशन यांनी पहचान प्रकल्पांतर्गत पुढाकार घेतला आणि उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सदरहू उपक्रम यशस्वीपणे राबविला. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या वतीने प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव आणि निरीक्षक दळवी यांनी सहकार्य केले. टाटा स्टील फाऊंडेशनतर्फे भावेश रावल (युनिट लीड) आणि उदय गावंड (क्षेत्रीय समन्वयक) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, सरचिटणीस संतोष पवार, उपाध्यक्ष दिनेश घरत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगडभूषण दत्ता गोंधळी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर, सदस्य मनीष कातकरी यांनी मेहनत घेतली. जातीचे दाखले मिळाल्यावर आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. सदरहू दाखले त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी उपयुक्त ठरतील, असे मत टाटा फाऊंडेशनचे भावेश रावल यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास टाटा फाऊंडेशनचे भावेश रावल (युनिट लीड), अनिकेत घोसाळकर (असिस्टंट मॅनेजर), उदय गावंड, महसूल विभागतर्फे मंडळ अधिकारी पानसरे, आदिवासी विकास प्रकल्प प्रतिनिधी दळवी, उरण सामाजिक संस्थेचे दत्ता गोंधळी, नामदेव ठाकूर, मनीष कातकरी, आदिवासी सेवक रत्नाकर घरत, स्थानिक आदिवासी प्रतिनिधी नगरसेवक महेश पवार, जानू वाघमारे हे उपस्थित होते. प्रा राजेंद्र मढवी यांनी समन्वयकाची भूमिका पार पाडली.

पान १ वरून

## १५ जण ठार, ६० जखमी

पूर्व रेल्वेच्या सीपीआरओच्या म्हणण्यानुसार, पॅसेंजर ट्रेनच्या शेवटच्या बाजूलास दोन पार्सल आणि एक एसएलआर कोच जोडण्यात आला होता. त्यात प्रवासी नव्हते. दोन लोको पायलट आणि एक एका गार्डसह आठ जणांचा या अपघातामध्ये मृत्यू झाला आहे. रेल्वेच्या पाच डब्यांचे नुकसान झाले आहे. फिटनेस चाचणीनंतर ट्रेन सियालदहला रवाना केली जाईल. रेल्वे सेवा एकेरी लाईनवर सुरू करण्यात आली आहे.

कांचनजंगा एक्स्प्रेस आगरतळाहून पश्चिम बंगालमधील रियालदहला जात होती. लाल सिग्नलमुळे एक्स्प्रेस ट्रेन सिलीगुडीतील रंगपानी स्टेशनजवळ रुईथासा येथे थांबवण्यात आली. दरम्यान, मागून येणाऱ्या मालगाडीने तिला धडक दिली. मुसळधार पावसामुळे मालगाडीच्या पायलटला सिग्नल दिसला नाही, त्यामुळे हा अपघात झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही धडक इतकी जोरदार होती की एक्स्प्रेस ट्रेनचा एक डब्बा मालगाडीच्या इंजिनला हवेत लटकला. इतर दोन डबे रुळावरुन घसरले. एनडीआरएफ आणि एसडीआरएफसह रेल्वे आणि बंगालचे अधिकारीसुद्धा बचावकार्यासाठी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते.

## निवृत्त शिक्षकांना नारळ

विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी देण्यात आली. यासाठी १६९ निवृत्त शिक्षकांची निवड करण्यात आली होती. महिना २० हजार रुपये मानधन देण्याचे सरकार आणि प्रशासनाने मान्य केले होते.

निवृत्त शिक्षकांना मिळणारी पेन्शनदेखील मानधनाच्या डबल आहे, परंतु प्रशासनाने ते देण्याचे कबूल केल्याने ते वेळेवर देणेदेखील तितकेच गरजेचे आहे, कारण ते मानधन आहे. डिसेंबर २०२३, जानेवारी, फेब्रुवारी २०२४ या तीन महिन्यांचे मानधन देण्यात आले. त्यासाठीदेखील प्रशासनाकडे पाठपुरावा करावा लागल्याचे निवृत्त मुख्याध्यापक अजय पाटील यांनी 'कृषीवल'शी बोलताना सांगितले. अद्यापही उर्वरित मानधन देणे बाकी असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

सेवा समाप्तीचे पत्र देताना एवढा उशीर केला. तसेच हे पत्र व्हॉट्सॲपवर का पाठवले, ज्या निवृत्त शिक्षकांना कमी केले, त्यांची सामूहिक यादी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी प्रसिद्ध केली आहे का, असे प्रश्न पाटील यांनी उपस्थित केले आहेत.

### सेवा रद्द करण्याचे पत्र उशिरा

**निवृत्त शिक्षकांची तात्पुरती सेवा रद्द करण्यासंबंधीचे पत्र काढले आहे. त्यावर २९ मे २०२४ अशी तारीख आहे. पत्र मे महिन्यातच तयार होते, मग ते एवढ्या उशिराने का पाठवण्यात आले. कंत्राटी पद्धतीने कामावर ठेवण्याचा अधिकार हा प्रशासनाचा आहे. तसाच त्यांनी शिक्षकांचे मानधनदेखील वेळेवर देणे गरजेचे आहे. कारण, तरतूद असल्याशिवाय कंत्राटी पदांना मंजुरी मिळत नाही. मग मंजुरी असेल तर निवृत्त शिक्षकांचे मानधन कोणाच्या**

**घशात गेले, असा सवाल उपस्थित होत आहे.**

## बाप रे! ४२२ जागांसाठी ३१ हजार अर्ज

मैदानी चाचणी येत्या २१ जूनपासून घेण्यात येणार आहे. ही चाचणी नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुल व कुरुळ येथील आरसीएफ वसाहतीमधील क्रीडा संकुलामध्ये घेतली जाणार आहे. सध्या पावसाचा हंगाम आहे. या पावसात ही प्रक्रिया योग्य पद्धतीने व्हावी यासाठी पोलीस दलाने नियोजन केले आहे. जास्त पाऊस असल्यास ही प्रक्रिया पुढे ढकलण्यात येणार आहे. पावसाने विश्रांती घेतल्यास मैदानांची पाहणी करून या प्रक्रियेला पुन्हा सुरुवात केली जाणार आहे. शुक्रवारी होणाऱ्या मैदानी चाचणीसाठी सुरुवातीचे आठ दिवस पाचशे उमेदवारांना बोलावले जाणार आहे. त्यानंतर हवामानातील बदलानुसार पुढे आठशे उमेदवारांना चाचणीसाठी बोलावले जाणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली. एक महिनाही या चाचणीसाठी लागण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

**भरतीवर दृष्टीवर**

| पदे | जागा | एकूण प्राप्त अर्ज | पुरुष | महिला |
|---|---|---|---|---|
| पोलीस शिपाई | ३८२ | २७,०६० | २२,५९० | ४,४७० |
| पोलीस चालक | ०३१ | २,२३० | २,०९६ | १३४ |
| पोलीस बॅन्ड्समन | ००९ | १,७७३ | १३८३ | ३९० |
| **एकूण** | **४२२** | **३१,१०६३** | **२६,०६९** | **४,९९४** |

## बँक लोनच्या नावाखाली फसवणूक

मोबाईलद्वारे शेकडो लोकांना लोन दिले, तशी त्याने त्यांची लिस्ट दाखवली. मी विश्वासाने त्याला माझे सर्व डॉक्युमेंट्स दिले. सिस्टीम चालत नाही म्हणून माझ्याकडे मोबाईल राहू दे म्हणून त्याने विश्वास देऊन मोबाईल स्वतःजवळ ठेवला. त्यानंतर त्याने मला सांगितलं की, तुझ्या मोबाईलवर मी दीड लाखांचे लोन घेतले आहे. एवढी रक्कम तुला तर नको आहे, तू फक्त वीस हजार ठेवून एक लाख तीस हजार मला परत दे, बाकी सगळे लोनचे हप्ते मी स्वतः भरेन, त्याच्या गोड बोलण्यावर आणि त्यांच्या मित्रांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून मी एक लाख तीस हजार रुपये त्याला ऑनलाईन परत केले; परंतु दुसरा महिना आल्यावर हप्त्याच्या तारखेला त्याने मोबाईलचा हप्ता भरलाच नाही. उलट, माझ्या अकाऊंटमधील सर्व पैसे हप्त्याच्या रूपाने काढून घेतले. त्यानंतर मला समजले की, माझ्या नावावर एकच नाही तर अजून चार लोन काढलेले आहेत. त्यात दीड लाखाचे कॅश टर्म लोन, दीड लाखाचा मोबाईल, पन्नास हजारांचा मोबाईल, एक साठ हजारांचा लॅपटॉप, अशी पाच ते साडेपाच लाखांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

यासंदर्भात मी उरण शहरातील अमर ग्लोबल मोबाईल शॉप व्यावसायिकांच्या दुकानाकडे आपली फसवणूक झाल्याची माहिती घेण्यासाठी गेलो असता, सदर शॉपचे शटर बंद असल्याचे दिसून आले. एकंदरीत, माझ्याप्रमाणे जवळ जवळ ३०० जणांची फसवणूक झाल्याची माहिती समोर येत आहे. याप्रकरणी आम्ही पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे.तरी, उरण पोलिसांनी याप्रकरणी लक्ष केंद्रित करावे जेणेकरून यापुढे कोणाचीही फसवणूक होणार नाही, असे आवाहन शेवटी फसवणूक झालेल्या अजय शिवकर यांनी केली आहे.

## ...अनधिकृत खोदकाम

काम बंद करण्यात आले होते. मात्र, चार-पाच दिवसांपासून पुनश्च हे काम सुरू करण्यात आले आहे. या कामाचे खोदकाम व बांधकाम करण्याकरिता सुरई गावातील राजिप शाळेच्या जवळून अवजड वाहनांची जा-ये सुरू आहे. या वाहनांतून बांधकाम साहित्य ने-आण केले जाते. या शाळा परिसरात लहान मुलांचा वावर असल्याने अपघातास आमंत्रण ठरते, तसेच डोंगर परिसरात मशीनद्वारे खोदकाम सुरू असून, परिसरातील डोंगराला हादरे बसत आहेत. मशीनद्वारे दिवसरात्र सुरू असलेल्या खोदकामाने डोंगराला तडे जाण्याची दाट शक्यता असून, डोंगर माथ्यावरून खाली वसलेल्या सुरई गावाच्या घरावर या डोंगरातील दरडी कोसळण्याची भीती ग्रामस्थांना सतावत आहे. त्यामुळे जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्यात अशी काही आपत्ती निर्माण झाली तर संबंधित जबाबदार राहतील, असे निवेदनात म्हटले आहे. तसेच दत्त मंदिर परिसरातील डोंगरातील अनधिकृत खोदकाम व बांधकामास सुरई ग्रामस्थांचा विरोध असून, तेथील अनधिकृत खोदकाम व बांधकामे बंद करावीत, अशी मागणी या निवेदनात केली आहे. तसेच सुरई गावचे राजिप शाळेजवळून होत असलेली अवजड वाहतूक त्वरित बंद करण्यात यावी, अशी मागणी केली होती.

दत्त मंदिर टेकडीवर सुरई ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता, शासकीय योजनेचे काम सुरू करण्यात आले आहे. तेथील ठेकेदारांनी या कामाबाबत कोणत्याही प्रकारची माहिती सुरई ग्रामस्थांना दिली नाही, त्यामुळे संतप्त महिलांनी टेकडीवर जाऊन काम थांबविले असून, रेवदंडा पोलिसांना त्वरित काम थांबवावे, अशी मागणी केली आहे.

## ट्रेकर्स दरीत कोसळला

ट्रेकर्स पायवाटेने गड उतरण्याच्या तयारीत असताना रियाचा पाय घसरला आणि ती साधारण २०० फूट खोल दरीत कोसळली. सोबत असलेल्या मित्रांनी मदतीसाठी धावाधाव सुरू केली. रियाला रेसक्यू करण्यासाठी माथेरान येथील रेस्क्यू टीम घटनास्थळी पोहोचली. या टीमचे वैभव नाईक, सुनील ढोले, सुनील कोळी, महेश काळे, चेतन कोळंबे, तसेच नेरळ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक अमोल साळुंखे यांच्यासह बचावकार्यात सहभाग घेतला.

## ७८ इमारती धोकादायक

असल्याची माहिती नगरपरिषदेकडून प्राप्त होत आहे. मात्र, असे असतानाही काही धोकादायक इमारतींमध्ये आजही रहिवाशांनी आपला संसार थाटला आहे, तर काही व्यावसायिकांनी ग्राहकांच्या जीवाशी खेळ खेळत आपला व्यवसाय सुरू केला असल्याचे दिसून येत आहे. अशा व्यावसायिकांकडून उरण नगर परिषद व्यवसाय कराची वसुली सुरू करत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यामुळे दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार हे नगर परिषदेचे अधिकारी वर्ग असणार आहे, अशी प्रतिक्रिया जनमानसात व्यक्त केली जात आहे.

## जनावरांची कत्तल; आरोपींना अटक

३१ सेमी लांबीचा चाकू, १००/- रु. किमतीचा एक निळ्या रंगाची प्लॅस्टिक मूठ असलेला ३३ सेमी लांबीचा चाकू, ४०/- रु. किमतीचा एक लाकडी मूठ असलेला ३० सेमी लांबीचा लोखंडी पात्याचा चाकू, ५०/- रु किमतीचा एक काळ्या व रंगाची प्लॅस्टिक मूठ असलेला ३१ सेमी लांबीचा लोखंडी पात्याचा चाकू, ५०/- रु किमतीचा एक चॉकलेटी रंगाची प्लॅस्टिक मूठ असलेला ३१ सेमी लांबीचा लोखंडी पात्याचा चाकू, ५०/- रु किमतीचा एक सफेद रंगाची प्लॉस्टिक मूठ असलेला ३६ सेमी लांबीचा लोखंडी पात्याचा चाकू, १००/- रु किमतीचा एक लाकडी मूठ असलेला ३७ सेमी लांबीचा लोखंडी पात्याचा सुरा, १००/- रु किमतीचा एक लाकडी मूठ असलेला ३० सेमी लांबीचा लोखंडी पात्याचा सुरा, १००/- रु किमतीचा एक लाकडी मूठ असलेला २७ सेमी लांबीचा लोखंडी पात्याचा सुरा, ७५०/- रु किमतीच्या फिक्कट गुलाबी रंगाची दोन घमेली त्यापैकी एका घमेल्यात शेण, तर दुसऱ्या घमेल्यात गोवंशीय प्राण्याचे ०१ किलो मांस (बादली व मांसाची एकूण किंमत), १०,५००/- रु किमतीचे घटनास्थळी धड, पाय, मुंडके व बारीक कापलेले अशा स्वरुपात मिळून आलेले गोवंशीय जनावरांचे एकूण ७० किलो मांस एकूण किंमत १३,३९० रु. मिळून आले. माणगाव पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले असून, घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, पो. नि. राजेंद्र पाटील, स.पो.नि. भोसले, स.फौ. मगर यांनी भेट दिली असून, पुढील तपास स.पो.नि. भोसले करीत आहेत.

## एनडीआरएफचा पुन्हा तात्पुरता तळ

पोहोचून मदत आणि मदतकार्य सुरु करता यावे यासाठी पावसाळ्यात एनडीआरएफ तैनात करण्यात येत आहे.

सन २०२१ मध्ये महाड शहर आणि तालुक्यात दरड दुर्घटना आणि महापुराने थैमान घातले होते. या उपविभागाला वादळ, चक्रीवादळ, महापूर आणि दरडी कोसळण्याचा असलेला धोका विचारात घेऊन महाड येथे कायमस्वरूपी एनडीआरएफ तळ मंजूर करण्यात आले आहे. यासाठी राज्य शासनाने जागादेखील उपलब्ध करून दिली आहे. मात्र, केंद्र शासनाने अजूनही त्याला परवानगी दिलेली नाही. या ठिकाणी कायमस्वरुपी आपत्ती उद्भवत नसल्याने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) ऐवजी राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) उभारण्याचे सरकारच्या विचाराधीन असल्याचे याआधीच जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**जाहीर सुचना**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती सुमन गुलाबराव देशमुख, श्री.भरत गुलाबराव देशमुख, श्री भुषण गुलाबराव देशमुख श्रीमती साधना विलास हलपतराव, श्रीमती उज्वला उत्तमराव झुंझारराव यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे सायडोंगर, ता. कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४३/१ एकुण ०.२८.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १८/०६/२०२४

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो. कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक हरि गणपत मुने व किसन गणपत मुने यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५ | २ | ०-३६-४० | १-३१ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/०६/२०२४

**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता - ब्लॉक नं.१०१, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, पहिला मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मोबाईल नंबर ९६०४५४५७७७

**निवडक**

### काळ नदीत सापडला मृतदेह

**महाड :** आमशेत कोंड गाव हद्दीतील काळ नदीपात्रात कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला आहे.काळ नदीपात्रात अज्ञाताचा मृतदेह असल्याची खबर महाड एमआयडीसी पोलिसांना देण्यात आली होती. त्यानुसार मध्यरात्री दोनच्या सुमारास पोलिसांनी घटनास्थळावरून मृतदेहाचा ताबा घेतला होता. हा मृतदेह सडलेल्या आणि कुजलेल्या अवस्थेत असल्यामुळे त्याची ओळख पटवता आलेली नाही. या घटनेची नोंद महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मनसेतर्फे तुळस रोपवाटप

**पोलादपूर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना पोलादपूर शाखेकडून संस्थापक अध्यक्ष राजठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पोलादपूर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून विविध उपक्रम राबविण्यात आले. पोलादपूर शहरात विविध ठिकाणी तुळस रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी तालुका अध्यक्ष दर्पण दरेकर, राकेश सलागरे, प्रफुल पांडे, मुस्ताक मुजावर, ओंकार मोहिरे, आदेश गायकवाड, विशाल पवार, ओम महाडिक तसेच उद्योजक व्यापारी अथर्व बुटाला आदी उपस्थित होते.

### प्रशासनाची निष्क्रियता

**माथेरान :** ग्लानी दूर करण्यासाठी जवळचे पर्यटनस्थळ म्हणून बहुतांश पर्यटक हे माथेरानला पसंती देतात. सर्वच संबंधीत प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वाहनांच्या पार्किंग व्यवस्थेबाबाबत सुयोग्य पद्धतीने नियोजन नसल्याने वाहनांची प्रचंड गर्दी होताना दिसून येत आहे. अनेकदा त्यांना आपल्या गाड्या घाटातील रस्त्यावर पार्क करून दस्तुरीपर्यंत पायपीट करावी लागत आहे. एकंदरीत इथल्या निष्क्रिय प्रशासनाच्या चुकांची शिक्षा पर्यटकांना सोसावी लागत आहे.

### वकील संघटनेची सभा

**नागोठणे :** रोहा येथील कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालयात वकिलीचा सराव करणाऱ्या रोहा तालुक्यातील वकिलांची संघटना असलेल्या रोहा तालुका वकील संघटनेची शासकीय नोंदणी प्रक्रिया नुकतीच पूर्ण करण्यात आली आहे. याच रोहा तालुका वकील संघटनेची नोंदणी नंतरची पहिलीच सभा शनिवारी (दि.१५) सायंकाळी वकील रुममध्ये उत्साहात संपन्न झाली. यावेळी विविध महत्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात येऊन ठराव करण्यात आले.

### खोपोलीत अजगराची सुटका

**खोपोली :** कृष्णनगरपरिसरातूनवाहणाऱ्यानाल्याच्या बाजूला दाट झाडीत अजगर मासे पकडण्याच्या जाळ्यात गुरफटून गेल्याची घटना तौफिक शेख यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी तातडीने सर्पमित्र सुनील पुरी यांना संपर्क करून त्याबाबत माहिती दिली. सुनील पुरी यांनी परिस्थितीचा आढावा घेत तो अजगर मासे पकडण्याच्या जाळ्यामध्ये पूर्णपणे अडकल्याचे निदर्शनास आले. अजगराला पकडून त्याला कोणतीही इजा होणार नाही याची काळजी घेत संकटमुक्त केले.

# कामथे घाटाची वाट बिकट

## घाट निर्मितीसाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज; माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश मालुसरे यांची खंत

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

म्हाप्रळ-वरंध-भोर-पंढरपूर रस्त्यावरील भोर घाटातील बांधकामासाठी तब्बल दोन महिन्यांचा मेगाब्लॉक घेऊनही भोर घाटातील पडझड सुरूच आहे. भोर घाटाला ताम्हाणी आणि आंबेनळी घाटाचे दोन लगतचे पर्यायी मार्ग असून या मार्गाच्या वापरामुळे लाखो लोकांना कोट्यवधीचा नाहक भुर्दंड होत असल्याने पोलादपूर तालुक्यामध्ये पुणे शहराकडे जाणाऱ्या मार्गासाठी तालुक्यातील चिखली गावातील रमेश मालुसरे या माहितीचा अधिकार कार्यकर्त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे कामथे ते पुणे जिल्हा हद्द रस्ता क्र. १६६ प्रस्तावित करण्यात आला आहे. मात्र, आता कापडे कामथे पुणे घाटाच्या निर्मितीसाठी प्रयत्न होण्याची गरज आहे.



पोलादपूर तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कापडे ते कामथे रस्त्याचे काम ६ वर्षापूर्वीच पूर्ण झाल्यानंतर पहिल्याच पावसाळयात रस्त्याची दूरवस्था झाली. हे काम पूर्ण झाल्यानंतर येत्या काही वर्षांमध्ये राज्य व केंद्रसरकारच्या माध्यमातून पोलादपूर कापडे कामथे पुणे घाटाची स्वप्नपूर्ती २०२१ सालापर्यंत शक्य असल्याची माहिती माहितीचा अधिकार कार्यकर्ते रमेश मालुसरे यांनी दिली होती. मात्र, राज्य सरकार नेहमीच कोसळणाऱ्या वरंध घाटावर सातत्याने खर्च करीत असल्याने नवीन घाटाची निर्मिती करण्याकडे सपशेल दुर्लक्ष झाल्याचे आरटीआय कार्यकर्ते रमेश मालुसरे यांनी खेदपूर्वक मत व्यक्त केले आहे.

मुंबईत नोकरी करून गावी चिखली येथे भाडोत्री वाहनाने येताना कापडे रस्त्यावरील खड्डयांमुळे नादुरूस्त झालेल्या वाहनामध्ये तब्बल दहा तासांहून अधिक काळ अडकल्याने १६ नोव्हेंबर २००२ पासून कापडे कामथे रस्त्यासाठी पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा करणारे रमेश मालुसरे यांना २००५ नंतर माहितीचा अधिकाराचा आधार मिळाला. त्यामुळे या रस्त्याच्या कामाबाबत पाठपुरावा करण्याचे सामान्य माणसाचे प्रयत्न असामान्य ठरू लागले आहे. या कापडे ते कामथे रस्त्यामुळे कापडे बुद्रुकच्या १२ वाड्या, वाकणच्या १२ वाड्या, साखर, आडावळे बुद्रुक, मोरसडे, बोरघर, कामथे या सात गावांचा थेट तर रानवडी, घागरकोंड, बोरावळे, नाणेघोळ, केवनाळे, बोरज, उमरठ, चांदके, ढवळे, आडावळे खुर्द, चिखली, सडे, नावाळे, वडघर, चांदले, साळवीकोंड, गोवेले, खांडज, देवळे, हळदुळे, दाभिळ, लहुळसे व करंजे ही २३ गावे अशी ३० गावांची १९ हजारांहून अधिक लोकसंख्या मूळ रस्त्याला जोडली गेली आहे. त्यामुळे तालुक्याच्या अर्ध्याअधिक लोकसंख्येला मिळालेला हा रस्ता केवळ तालुक्याच्या किंवा बाजाराच्या गावापर्यंत पोहोचविण्यापुरताच न राहता पुणे जिल्ह्याला जोडण्यात यावा आणि येथील शेतीमाल विक्री तसेच सुशिक्षितांना पुणे शहर परिसरामध्ये रोजगार संधी मिळावी, या अपेक्षेने रमेश मालुसरे यांनी माहितीच्या अधिकारामध्ये २०१० पासून केलेल्या पाठपुराव्याला यश येऊन कामथे घाटाचा समावेश करण्यात येऊन २००१ ते २०२१ पर्यंतच्या यादीमध्ये कामथे ते पुणे जिल्हा हद्द रस्ता क्र. १६६ असा प्रस्तावित करण्यात आला आहे.

अलिकडेच, सातत्याने वरंध भोर घाटाची पडझड होत असताना राज्य सरकार याच घाटाच्या दुरूस्तीवर अधिक भर देत दुरूस्तीच्या कामांमुळे वरंध भोर घाटामध्ये तब्बल २ महिन्यांचा मेगाब्लॉक घेण्यात आला. हा घाट दोन महिने बंद राहिल्यामुळे माणगांव, निजामपूर, ताम्हिणी घाट आणि पोलादपूर महाबळेश्वर वाई ते पुणे बंगलोर द्रुतगती महामार्ग या पर्यायांचा अवलंब करून लाखो प्रवाशांचे कोट्यवधी रूपये नाहक खर्च होऊन वेळेचाही अपव्यय झाला. पुन्हा भोर घाटामध्ये खरवलीजवळ दोन दिवसांपूर्वी दरड कोसळल्याने मेगाब्लॉकनंतरही पडझडीचे प्रकार सुरूच आहेत. यामुळे पोलादपूर, कापडे ते कामथे हा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचा रस्ता सक्षम बनविण्यासाठी अलिकडेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला असून सर्व पुलांचे बांधकाम नव्याने करण्याची निविदादेखील निघाली आहे.

पोलादपूर तालुक्यातूनच अल्पावधीत पुणे जिल्हा हद्दीपर्यंत नवीन रस्ता अस्तित्वात येण्याचे नियोजन आरटीआय कार्यकर्ते रमेश मालुसरे यांच्या पाठपुराव्यामुळे तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांनी २०२१ पर्यंत पूर्तता करण्यासाठी दिले होते. मात्र, यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज असल्याचे आरटीआय कार्यकर्ते रमेश मालुसरे यांचे म्हणणे आहे.

## नागोठण्यात तुरळक पावसातही विजेचा लंपडाव सुरू

**। नागोठणे । वार्ताहर।**

गेल्या काही दिवसांपासून नागोठणे शहर व परिसरात तुरळक प्रमाणात पडणाऱ्या पावसामुळे नागरिक सुखावले असले तरी त्याचवेळी वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने नागरिक व विविध प्रकारचे लहान-मोठे व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. पाऊस नसतानाही विजेचा लपंडाव सुरूच राहत आहे. दरम्यान विजेची बिले वसुली करताना नागरिकांच्या मागे तगादा लावणारे वीज कर्मचारी सुरळीत वीजपुरवठा देण्यात अपयशी ठरत असल्याने नागरिकांकडुन वीज वितरण कंपनीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

वीज वितरण कंपनीच्या नागोठणे कार्यालयाअंतर्गत असलेल्या नागोठणे शहर व नागोठणे परिसरात सध्या वीज वारंवार जाण्याचे प्रकार घडत आहेत. एकदा का वीजपुरवठा खंडित झाला की, तो परत येण्यास तासन्तास वाट पहावी लागत आहे. गेले काही दिवस तर मध्यरात्री, पहाटे, सकाळी, दुपारी अशा कोणत्याही वेळी वीजपुरवठा खंडित होत आहे. वीज कशामुळे गेली हे विचारण्यासाठी कार्यालयात फोन केला तर कुणी उचलत नाही. तसेच मोबाईल वर फोन करावा तर

### नागरिकांमध्ये तीव्र संताप

तोही उचलण्याचा त्रास कर्मचाऱ्यांना होत आहे. सोमवारी (दि.१७) अशाचप्रकारे अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांनी वीज कंपनीविरोधात समाज माध्यमांवर आक्रोश व्यक्त केला. त्यामुळे वीज वितरणच्या नागोठणे कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वीज दुरूस्तीची सर्व कामे व वीज वाहिनी जवळून गेलेली झाडे तोडण्याची कामे पावसाचा जोर वाढण्यापूर्वीच पूर्ण करुन विजेचा लपंडाव थांबवून जनतेला दिलासा द्यावा. अन्याथा एक दिवस तरी येथील जनतेचा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही असेही नागरिकांतून बोलले जात आहे.

वीज वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता नितीन जोशी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी वीजपुरवठा खंडित होण्याची अनेक कारणे सांगितली. वीज वाहिनीवर बसणारे पक्षी, जंपर तुटणे, झाडांच्या फांद्या वाहिनीवर पडणे अशा अनेक कारणांमुळे वीजपुरवठा खंडित होत असतो. सकाळी निडी येथे वाहिनी तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाल्याचेही जोशी यांनी स्पष्ट केले.

# दाखणे येथे २१०० झाडांची लागवड

## विश्वास उभारे प्रतिष्ठानचा वृक्षारोपणाचा उपक्रम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दाखणे हद्दीमध्ये मौजे दाखणे खर्डी बुद्रुक व कोशिंबळे तर्फे निजामपूर या गावांमध्ये विश्वास उभारे प्रतिष्ठानमार्फत रविवारी (दि. १६) २१०० झाडांची लागवड करण्यात आली.यावेळी दाखणे खर्डी व कोशिंबळे गावातील स्थानिक ग्रामस्थ, महिला मंडळ, तरुण वर्ग तसेच खास मुंबईकर चाकरमानी या स्तुत्य उपक्रमासाठी उपस्थित होते.



दाखणे ग्रामपंचायतीमध्ये विकासकामे मोठ्या प्रमाणात झाली असून नव्याने झालेले डांबरी रस्ते त्याचप्रमाणे गावाच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली. समस्त मानव जातीला उन्हाची झळ बसत असून दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत जात आहे आणि आणि असाच उन्हाचा पारा चढत राहिला तर भविष्यात खूप मोठ संकट समस्त मानव जातीवर वाढवणार आहे. त्यासाठी प्रत्येक गोष्ट सरकारकडून प्रशासनाकडून होईल या आशेवर न थांबता प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य म्हणून पर्यावरणाचे संरक्षण करणे कम प्राप्त ठरते. याच भावनेतून विश्वास उभारे प्रतिष्ठानच्या सभासदांच्या माध्यमातून राबविण्यात आलेला हा पहिलाच सामाजिक उपक्रम आहे. यामध्ये आबालवृद्ध सहभागी झाले होते.

मागील वर्षी वटपौर्णिमेच्या सणानिमित्त खर्डी बुद्रुक या गावातील समस्त महिलांना ८० वड या वृक्षाचा वाटप करून उपक्रम राबवला होता. त्याचप्रमाणे खर्डी बुद्रुक गावातून लग्न झाल्यानंतर मुलगी सासरी जाताना दोन झाड लावली जातात. तर ज्या वेळेला एखादी मुलगी गावात नव्याने सून म्हणून येते त्यावेळी दोन झाडे लावली जातात. व त्याची जोपासना मनापासून केली जाते.

# दगडी पाटी झाली कालबाह्य

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आधुनिक युगामध्ये सारेकाही बदलत चालले आहे. काळानुसार शाळेतील दगडी पाटी केव्हाच गायब झाली आहे. त्याची जागा आता वह्या-पुस्तकांनी, इलेक्ट्रॉनिकसाधनांनी घेतली आहे. पूर्वी पहिली ते चौथीपर्यंत पाटीचाच वावर व्हायचा; परंतु आता पहिलीपासूनच मुलांना वही-पेन्सिल असल्याने पाटी नजरेआड झाली आहे.

प्राथमिक-माध्यमिकशाळा सुरू झाल्या आहेत. बाजारपेठेत आपल्या पाल्यासाठी दप्तर, वह्या, पुस्तके, गणवेश या वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालकांची गर्दी होत असली तरी यात दगडी पाटी कालबाह्य झालेली दिसते. बदलत्या काळानुसार अभ्यासक्रमात व त्यांच्या साहित्यामध्येही खूप बदल झाले आहेत. हल्ली मुलांच्या हाती पाटीऐवजी वह्या, मोबाईल टॅब, संगणक दिसतात; तर पेन्सिलऐवजी पेन. बालवाडीतील मुलांना पाटीचा आधार घेऊन रेषा, विविध



आकार, चित्रे रंगवण्यासाठी दिली जाते. त्यानंतर पहिलीपासून ही पाटी अडगळीत पडून कायमचीच लुप्त होते. एरवी अगदी पाचवी-सहावीपर्यंत वापरली जाणारी पाटी आता पूर्णतः गायब झाली आहे. पूर्वी शिक्षणाचा श्रीगणेशा दगडी पाटीवरच व्हायचा. दसऱ्याला पाटीवर सरस्वतीचे चित्र काढून पूजा केली जायची. शाळा म्हणजे पाटी, आणि पाटीवर गिरवलेले अक्षर म्हणजे सुरेख लेखन, अशी शिक्षणाची पद्धत होती, मात्र आता शाळा म्हणजे नवा गणवेश, पाठीवर बॅगेऐवजी सॅक, दगडी पाटीऐवजी वही, पेन्सिल, टॅब आदी आधुनिक प्रणाली मुलांच्या अंगवळणी पडली आहे.

## आरोपी गजाआड

**। पनवेल । वार्ताहर ।**

कामाचे पैसे न दिल्यावरुन एका इसमाचा खुन करून बिहार येथे पसार होण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीला गुन्हे शाखेने कल्याण रेल्वे स्टेशन येथून ताब्यात घेवून गजाआड केले आहे.सद्दाम हुसेन अन्सारी याने नावडे परिसरात १० दिवस इलेक्ट्रीक फिटींगचे काम केले होते. त्या कामाचे पैसे मागण्यासाठी तो परवेज अन्सारी याच्याकडे गेला असताना आता मी तुला पैसे देऊ शकत नाही. २० तारखेला पैसे देतो असे परवेजने त्याला सांगितले. परंतु, माझ्या कामाचे पैसे मला आत्ताच दे, असे सद्दामचे म्हणणे होते. यातूनच त्यांच्यात बोलाचाली होवून सद्दामने रागाच्या भरात त्याच्याकडे असलेला चाकू काढून तो परवेज याच्या छातीवर भोसकला.

## कोर्लईत घर खरेदी विक्रीत फसवणूक

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

कोर्लई येथे घर खरेदी विक्रीत फसवणूक करणाऱ्या इस्टेट एजंटवर रेवदंडा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याप्रकरणी इस्टेट एजंटने केलेले अटकपूर्व जामिन फेटाळण्यात आल्याने रेवदंडा पोलिसांनी त्यास अटक केली व मुरूड कोर्टात हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

मिलर रूबान रूझारिओ यांनी कोर्लईमधील इस्टेट एजंट रॉकी तोमास ग्रेसिएस यास कोर्लई येथील घर मिळकत क्रमांक ६१९/अ/२ व घर मिळकत खरेदी करण्यासाठी रेवदंडा अर्बन बँक येथून आरटीजीएसव्दारे एकूण पंधरा लाख पन्नास हजार रूपये दिले. मात्र त्याने व्यवहारात फसवणूक केली.

याबाबत मिलर यांनी रॉकी विरोधात घर खरेदी व्यवहारात विश्वासघात व फसवणूक केल्या प्रकरणीत तक्रार केली होती. परंतु रॉकी तोमास ग्रेसिएस यांनी याबाबत उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावल्यानंतर रेवदंडा पोलिसांनी त्यांस अटक केली.



● मुरूड तहसीलदार कार्यालयासमोर मोठे गुलमोहराची झाड लाल फुलांनी बहरले होते. पहिल्या पावसात कार्यालयाच्या प्रांगणात लाल फुलांचा सडा पडल्याने परिसर निसर्गरम्य झाला आहे. (छाया : सुधीर नाझरे)

## तहसील टेकडीवरील वृक्षारोपणात नागरिकांचा सहभाग

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील तहसील कार्यालय असलेल्या टेकडीवर वृक्षारोपण करण्यात आले. तहसील कार्यालयाच्या टेकडीवर दररोज असंख्य नागरिक चालण्यासाठी जात असतात. त्यांच्या सहभागाने दरवर्षी टेकडीवर वृक्षारोपण झाले. तर ज्येष्ठ नागरिक आणि महिला तसेच लहान मुलांचे देखील सहभाग या वृक्षारोपणात केला आहे.

कर्जत येथील मध्यवर्ती ठिकाणच्या शासकीय कार्यालये असलेल्या टेकडीवर पायऱ्यांच्या मार्गावर सभोवतालच्या मोकळ्या जागेवर दिलीप कदम, रामकुमार गुप्ता आदींच्या पुढाकाराने निसर्ग मित्रांच्या सहकार्याने वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात लहान मुलांबरोबरच, महिला वर्ग तसेच वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेले अनेक ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. तहसील टेकडीच्या पायी मार्गावर दगडी पायऱ्यांचे बाजूला बेल, कदंब, वड, पिंपळ, कडूनिंब, बदाम, जांभुळ, चिंच, उंबर आदीची लागवड करण्यात आली. दरवर्षी मोजकीच झाडे लावून त्याचे संवर्धन केल्यानेच एकेकाळी ओसाड झालेली ही टेकडी आता हिरवाईने बहरली आहे. या वृक्षारोपणासाठी नारायण जुन्नरकर यांनी वृक्ष लागवडीकरीता रोपे तसेच संदीप भालेराव, राजेश घेवारे यांनी सहकार्य केले.

या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात दिलीप कदम, सायली कदम, सोनिया गरवारे, जयंत पाटकर, श्रीकांत ओक, आशिष कोल्हे, महेंद्र चंदन, राजू पोतदार, राम कुमार गुप्ता, नरेश बैलमारे, दीपक भालेराव, मुकुंद भागवत, शिवा राजपूत, सुरेश पाटील, किशोर जैन, मनिषा हुलावले, रामकिशोर गुप्ता, मनिष परमार, राजू ओसवाल, कुमार ओसवाल, श्रीकांत मनोरे, आशुतोष कुळकर्णी, मनोहर पाटील, मुरलीधर पाठक, रणजीत जैन, अरविंद जोशी, विलास नलावडे, कमलेश जैन, अनिल साळंके आदी उपस्थित होते.



## दहा वर्षांपासून तलावाची स्वच्छता गाळातच;पाणीटंचाईचे संकट ओढवणार

# माथेरान शारलोट तलाव गाळमुक्तीच्या प्रतिक्षेत

**। माथेरान । वार्ताहर ।**

ब्रिटिशकालीन शारलोट तलाव अजूनही सफाईच्या प्रतीक्षेत आहे.गेली १० वर्षे सफाई न केल्यामुळे तलावात गाळ मोठ्या प्रमाणात साचला आहे. दोन वर्षांपूर्वी तलाव सफाई करणाऱ्यासाठी येथील श्री सदस्यांचे हात तयार होते . मात्र अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे तलावाचे गाळ काढण्याचे काम राहून गेले.

माथेरान या पर्यटनस्थळाचा शोध ब्रिटिशांनी लावला.त्यावेळी ब्रिटिशांनी भविष्याचा विचार करीत नियोजनबद्धपणे शारलोट तलाव बांधला तेंव्हापासून या शारलोट तलावाच्या पाण्याचा उपयोग माथेरान करांना पिण्यासाठी होऊ लागला. तीन बाजूंनी उतार असल्यामुळे पावसाचे पाणी तीन दिशांनी वाहून या तलावात येते.हे पावसाचे पाणी तलावात वाहून येताना माती, झाडाझुडपांची लाकडे, पर्यटकांनी टाकलेल्या पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या गाळरुपात तलावात साचून राहतात. ऑक्टोबरमध्ये हा तलाव तुडुंब भरल्यानंतर यातील पाणी मार्च महिन्या पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राखीव ठेवले जाते. ऑक्टोबर ते फेब्रुवारी पर्यंत पाण्याचा उपसा नेरळ कुंभे येथून केला जातो. त्यामुळे पाऊस पडे पर्यंत या तलावात पाणीसाठा असतो.नेरळ कुंभे येथून पाणी कधी आले नाही तर शारलोट तलावातील पाण्याचा उपसा केला जातो. त्यामुळे माथेरानमध्ये पाणीटंचाई भासत नाही. गेल्या दहा वर्षात येथे तलावाची सफाई झाली नाही.२०१४ मध्ये नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून तलावाची सफाई

> शारलोट तलावाची स्वच्छता होणे गरजेचे आहे. जितके जास्त पाणी साचेल तितका पाण्याचा साठा वाढेल. पूर्वी दरवर्षी तलावातील गाळ काढला जात असे तिच मानसिकता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी आणि माथेरान नगरपालिकेने दाखवायला हवी. एकमेकांच्या समन्वयाने हे काम तडीस जाऊ शकते.
>
> – जनार्दन पार्टे, सामाजिक कार्यकर्ते, माथेरान

करण्यात आली होती. २०१४ नंतर या तलावाकडे ना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लक्ष दिले ना नगर पालिकेने त्यामुळे १० वर्षांत तलावात गाळ मोठ्या प्रमाणात आला आहे.



महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि माथेरान नगरपालिका मिळून हा तलाव गाळ मुक्त करावा अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत. मागील २०२२ मध्ये शारलोट तलाव गाळमुक्त करण्यासाठी पालिकेने जोरदार प्रयत्न केले.यासाठी धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत सकारात्मक प्रतिसादही मिळाला. तलाव स्वच्छतेसाठी सर्व साहित्यांची व्यवस्था पालिकेकडून केली गेली. तलावातील पाणी सोडल्यामुळे त्या मार्गातील गावांना धोका होऊ नये, यासाठी त्या गावांशी पालिका व एमजेपीच्या अधिकाऱ्यांनी संपर्क साधला नाही.त्यामुळे हि सगळी प्रक्रिया फक्त कागदावरच राहिली.

# विकासाची राम-कहाणी

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मोदींच्या भाजपला सर्वात मोठा दणका उत्तर प्रदेशाने दिला आहे. अयोध्येतील राममंदिराचे २२ जानेवारीला उद्घाटन झाल्यानंतर आता भाजपने निवडणुका जिंकल्यातच जमा आहेत असे सर्व जण म्हणत होते. मला विरोधी पक्ष कुठे रिंगणात दिसतच नाही असे मोदी सांगत होते. चारशेपारचा नारा त्याच वाटण्यातून दिला गेला. प्रत्यक्षात उत्तर प्रदेशात भाजपची दाणादाण उडाली. खुद्द अयोध्येतही भाजपचा सुपडा साफ झाला. त्यामुळे हिंदुत्व, राममंदिरासारखे विषय हे हमखास विजय मिळवून देतात हा जो एक बकवास भाजपने मिडियाच्या आणि आपल्या भक्तांच्या डोक्यात घातला आहे त्याचा पुरता पर्दाफाश यावेळी झाला. अयोध्येत तर कमालच झाली. अयोध्या ज्या मतदारसंघात येते तो राखीव नाही. तरीही तेथे पासी या मागास जातीचे उमेदवार निवडून आले. याच अयोध्येत कारसेवकांवर गोळ्या चालवल्या म्हणून मुलायमसिंग यादव यांना मुल्ला मुलायम अशी पदवी संघ परिवाराने बहाल केली होती. अवधेशप्रसाद हे त्याच मुलायम यांच्या समाजवादी पक्षातर्फे निवडणूक लढवत होते. एकूण, मोदीभक्त आणि हिंदुत्ववाद्यांचे थोबाडच अयोध्यावासियांनी फोडले. राममंदिराच्या उद्घाटनाच्या वेळी पाचशे वर्षांपासूनच्या अन्यायाचा बदला घेतला वगैरे भाषा केली गेली. पण लोकांनी याला काडीची किंमत दिली नाही. अयोध्येत मंदिर झाल्यामुळे तेथे पर्यटनाला आता कसे उधाण येणार आहे व येत्या दहा वर्षात दहा कोटी लोक तेथे कसे जाणार आहेत वगैरे भरमसाठ दावे त्यावेळी केले जात होते. तेथील रस्ते, हॉटेले कशी चकाचक आहेत याची वर्णने येत होती. लोढा बिल्डरपासून अमिताभ बच्चनपर्यंत सर्व लोक अयोध्येत कशा जमिनी व घरे घेत आहेत याचे किस्से सांगितले जाते होते. पण प्रत्यक्षातले वास्तव भीषण होते. या सर्व तथाकथित विकासाची रामकहाणी वेगळीच होती. हा विकास करताना स्थानिक जनतेला अक्षरशः चिरडून टाकले गेले होते.

### अयोध्यावासीय बेदखल

मुळात मंदिर व समोरचा प्रशस्त रस्ता बांधताना शेकडो जुनी मंदिरे, घरे इत्यादी बेदरकारपणे तोडण्यात आली होती. तेथील रहिवाशांना पर्यायी जागा मिळतील असे सांगून तेथून अचानक हाकलण्यात आले होते. हे करताना त्यांना विश्वासात घेण्यात आले नव्हते. प्रत्येक वेळी सरकारचा हुकुम आहे असे सांगून गोष्टी रेटल्या जात होत्या. याविरुध्द कोठेही आवाज उठवण्याची सोय नव्हती. कारण, योगी सरकारचे पोलिस आणि बुलडोझर यांची भीती होती. जुन्या मंदिराच्या परिसरात छोटे धंदे करणारे लोक, फेरीवाले हेही बेसहारा झाले होते. नव्या चकचकीत पर्यटनामध्ये त्यांना स्थान नव्हते. लोढासारख्याच अनेक गुजराती व मारवाडी धंदेवाल्यांनी पैशांच्या जोरावर स्थानिक दुकानांचा व परिसराचा कबजा केला होता. या भागातील जमिनींचे दर पाहता पाहता आकाशाला भिडले. स्थानिक माणसांना हे सर्व परवडण्याच्या पलिकडे गेले. आपल्याच गावात आपण परके असा अनुभव लोकांना येऊ लागला. रामाबद्दल कितीही भक्ती असली आणि भाजपबद्दल प्रेम असले तरी शेवटी पोटाला चिमटा आणि बुडाला आग लागल्यानंतर हे प्रेम वितळून गेले. हा असंतोष व्यक्त करण्यासाठी जनता संधी शोधत होती. ती तिला लोकसभा निवडणुकीच्या वेळी मिळाली. गुप्त मतदान व प्रत्येकाला मताचा अधिकार ही किती मोलाची गोष्ट बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत देऊन ठेवली आहे हे या प्रसंगांवरून लक्षात यावे. दरम्यानच्या काळात, अयोध्येतील पर्यटन म्हणावे तसे वाढलेले नाही. अनेक राज्यांच्या राजधानीतून अयोध्येसाठी थेट सुरू करण्यात आलेल्या विमानसेवा बंद पडल्या आहेत. राम आणि राममंदिर यांचे भाजपला कौतुक असेल. किंवा ती त्यांची राजकीय गरज असेल. पण पदरचे पैसे खर्चून अयोध्येला जाण्याइतका उत्साह बाकी देशातील बहुसंख्य जनतेत शिल्लक राहिलेला नाही. मोदी आणि भाजपच्या विकासाच्या बहुतेक कल्पनांचे हेच झाले आहे. प्रचंड प्रसिध्दी आणि प्रचार करून लोकांना भुलवायचे. पण ठोस दाखवण्यासारखे काहीच नाही, असा हा प्रकार आहे.

### पेपरफुटीचा संताप

यातला संतापाचा भाग म्हणजे अयोध्येतील हिंदूंनी मोदीविरोधात आपला निषेध निवडणुकीतून व्यक्त करताच त्यांना मोदींच्या देशभरातील भक्तांनी जवळपास देशद्रोही ठरवायला सुरूवात केली आहे. यापुढे अयोध्येतील लोकांसाठी मोदींनी काहीही करू नये, यांचा विकास बंद करावा अशा सूचना अनेकांनी केल्या. कालपर्यंत हिंदूराष्ट्राच्या गप्पा मारणारे आज अयोध्येतील दलितांना जातीवरून शिव्या देऊ लागले आहेत. हा हिंदुत्वाचा हिंस्त्र पण खरा चेहरा आहे. यांना धर्म, नीती, न्याय, लोकशाही यांचे काहीही पडलेले नाही. यांच्या मनासारखे झाले नाही तर हे आपल्याच लोकांचे खूनही पाडायला कमी करणार नाहीत. मोदी हा यांच्या लेखी रामाच्याही वरचा देव झाला आहे. असले भक्तच शेवटी मोदींना खड्ड्यात घालतील. या राज्यात दुसरा निर्णायक ठरलेला मुद्दा म्हणजे पेपरफुटी. गेल्या काही वर्षात उत्तर प्रदेशातील सरकारच्या विविध पदांसाठी झालेल्या परिक्षांचे पेपर सातत्याने फुटले आहेत. परिणामी परीक्षा रद्द होऊन अनिश्चित काळपर्यंत त्या पुढे ढकलण्यात आल्या आहेत. राज्य सरकारातील कारकून किंवा पोलिस अशांसारख्या जागांकरिता ४८ ते ५० लाख मुलांनी अर्ज केले आहेत. उत्तर प्रदेशात एक लाख गावे आहेत. म्हणजे प्रत्येक गावातली सरासरी ५० मुले या परीक्षा देत असतात. त्यासाठी शहरात राहून व कोचिंग क्लास लावून तयारी करत असतात. आईबापांचे हजारो रुपये खर्चत असतात. इतके करूनही परीक्षाच रद्द होत असल्याने त्यांच्यामध्ये कमालीचा संताप निर्माण होणे साहजिक होते. या संतापाचा स्फोट या निवडणुकांमध्ये दिसून आला. मुळात राज्यात सरकारी नोकऱ्यांच्या जागा निघत नाहीत व निघाल्या तर अशी बोंब होते. मधल्या काळात देशातील सर्व वृत्तपत्रात उत्तर प्रदेशाचा कसा विकास चालू आहे याच्या पान-पानभर जाहिराती येत होत्या. त्यासाठी अक्षरशः हजारो कोटी रुपये खर्ची पडले असतील. तो विकास गेला तरी कुठे असा सवाल या निमित्ताने विचारायला हवा.

विचार

# नवे सरकार, नवी आव्हाने

***पंतप्रधान मोदींची तिसरी टर्म म्हणजेच पुढील पाच वर्षांची वाटचाल अनेक आव्हानांनी भरली आहे. मित्रपक्षांच्या मदतीने उभ्या राहिलेल्या एनडीए सरकारचे सुकाणू हाती धरुन भाजप काम करेल, मात्र या प्रयत्नात मित्रपक्षांची मर्जी राखण्याचे तसेच त्यांना न पटणारे निर्णय मागे ठेवण्याचे अप्रिय काम त्यांना करावे लागले. ही सत्वपरीक्षा देताना भाजपला पुढील काळात नेमक्या कोणत्या प्रश्नांना, आव्हानांना तोंड द्यावे लागेल?***

प्रा. नंदकुमार काळे

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्यानंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याचा बहुमान मिळवून हॅटट्रिक साधणारे नरेंद्र मोदी अर्थातच हा विक्रम नोंदवणारे गेल्या सात दशकातील दुसरे पंतप्रधान ठरले आहेत. लोकसभा निवडणुकीत पूर्ण बहुमताने सलग तिसऱ्यांदा देशात 'एनडीए'चे सरकार स्थापन झाले आहे. स्वाभाविकच ते एकट्या भाजपचे नाही तर 'एनडीए'चे आहे. गेल्या दोन निवडणुकींमध्ये पूर्ण बहुमत मिळाले असूनही भाजपला अनेकदा तडजोडी कराव्या लागल्या. तीन कृषी कायदे, भूसंपादन कायद्यासह अनेक कायदे मागे घेण्याची वेळ मोदी सरकारवर आली होती. आता तर बहुमतापेक्षा ३२ जागा कमी मिळाल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील अन्य घटक पक्षांवर भाजपची मोठी भिस्त असेल. या घटक पक्षांमधील काहींची भूमिका देशव्यापी हितापेक्षा राज्यहिताला प्राधान्य देणारी आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये भाजपा कोणतेही मोठे पाऊल सहज उचलू शकते, असा समज तयार झाला होता. मोदी सरकारकडे स्वबळावर मिळवलेले बहुमत होते. त्यामुळेच ते मोठे निर्णय सहज घेऊ शकत होते. यामुळेच काश्मीरमधील कलम ३७० हटवण्यात आले. तिहेरी तलाकविरोधात कायदा करण्यात आला. 'सीएए'बाबत ठोस भूमिका समोर ठेवण्यात आली. या वेळी त्या निर्णयांच्या बळावरच पुन्हा सरकार स्थापन करण्याची चर्चा होती. तिसरी टर्म यापेक्षा मोठ्या बदलांची, मोठ्या सुधारणांची असेल असे मोदी सतत सांगत होते. या सुधारणांमध्ये एक देश; एक निवडणूक, समान नागरी कायदा आणि काही प्रमाणात लोकसंख्या कायदा यांचा समावेश होता. माजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'एनआरसी' लागू करण्याचे सूतोवाच केले होते; पण असे निर्णय घेण्यासाठी लागणारे संपूर्ण बहुमत आता मात्र त्यांच्याकडे नाही.

या वेळी मोदी यांचे नाही तर 'एनडीए'चे सरकार आहे. म्हणूनच मित्रपक्षांच्या नाकदुऱ्या काढण्याची वेळ त्यांच्यावर आली. अटलबिहारी वाजपेयी यांचे धोरण सर्वसमावेशक होते. त्यामुळेच त्यांच्याशी जुळवून घेणे परस्परविरोधी मतांच्या राजकीय पक्षांनाही शक्य होत होते. मात्र मोदी यांचे तसे नाही. पण त्यांच्या नेतृत्वाला विरोध करत बाहेर पडलेले नेतेच आता त्यांच्यासोबत सत्तास्थापनेसाठी एकत्र आले आहेत. आताच्या सरकारमध्ये एकत्र आलेले प्रादेशिक पक्ष केवळ स्वत:साठी मोठ्या मंत्रीपदांची मागणीच करणार नाहीत तर सरकारच्या अनेक योजनांमध्ये ते हस्तक्षेपही करतील. या देशात केंद्रात मजबूत सरकार बनवायचे की लाचार सरकार हा कायमच चर्चेतला विषय राहिला आहे. असा वाद सुरू झाला कारण आघाडीच्या सरकारच्या काळात धोरण लकवा दिसला आणि सगळा वेळ एकमेकांची समजूत काढण्यात जातो, असा आरोपही केला गेला. डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या काळात भाजपचे नेते तत्कालीन सरकारवर ही टीका करत होते. पण आता तीच टीका विरोधक एनडीए सरकारवर करू शकतील. देशात जनतेने १९८४ नंतर थेट २०१४ मध्ये एका पक्षाला स्पष्ट जनादेश देऊन सरकार स्थापन करण्याची संधी दिली. पुढील टर्ममध्येही हा प्रकार घडला. मात्र या वेळी जनतेने पूर्ण बहुमत न दिल्याने देशात पुन्हा आघाडी सरकारचे युग आले आहे. त्यामुळेच हे सरकार मागील सरकारपेक्षा किती वेगळे असेल, या वेळी मोठे निर्णय होतील की नाही, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

भाजप आपल्या मूळ अजेंड्यावर पुढे जाऊ शकेल का, सामाजिक न्यायाशी संबंधित इतर मुद्यांनाच प्राधान्य द्यावे लागेल का, असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. शेवटी नितीशकुमार असो वा चंद्राबाबू नायडू, दोघेही गरिबांचे राजकारण करतात. त्यांचा खासगीकरण किंवा मोठ्या आर्थिक सुधारणांबाबतचा दृष्टिकोन फारसा सकारात्मक वाटत नाही. परिणामी, मोठ्या आर्थिक सुधारणांना ब्रेक लागण्याची चिंता व्यक्त होत आहे. मोदी यांना तिसऱ्या कार्यकाळात मोठी आर्थिक पायाभरणी करायची आहे. देशाला 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवणे असो वा जमीन आणि कामगार कायदे आणणे असो; सरकारला तिसऱ्या कार्यकाळात अनेक कठोर पावले उचलायची आहेत. पण आघाडी सरकार चालवण्याच्या प्रयत्नात हा वेग मंदावला जाऊ शकतो. कारण संसदेत आपल्याला हवे ते प्रत्येक विधेयक मंजूर करुन घेणे भाजपसाठी अधिक कठीण होणार आहे. भाजपचा अजेंडा मित्रपक्षांना आवडला नाही तर ते वेगळी भूमिका घेतात, हे अकाली दलासारख्या पक्षाने दाखवून दिले होते. पंजाबमधील अकाली दलासारख्या जुन्या मित्राने शेतीविषयक कायद्यांच्या नावाखाली एनडीए सोडण्याचा निर्णय घेतला होता, हे विसरता कामा नये.

अशा परिस्थितीत तिसऱ्या टर्ममध्ये मोदींना आक्रमक होऊन मोठे आणि कठीण निर्णय घेणे कठीण होऊ शकते. एक देश एक निवडणूक असो किंवा लोकसंख्या कायदा असो; संसदेत मंजूर करुन घेणे आता अवघड होईल. त्याचे आणखी एक कारण म्हणजे पूर्वी भाजप काही तटस्थ पक्षांची मदत घेत होते. आता तशीही परिस्थिती नाही. एक तर आता अशा मित्रांची संख्या कमी झाली आहे. त्यातच संसदेत भाजपकडे स्वबळावर बहुमतही नाही. सहाजिकच यामुळे आर्थिक सुधारणांच्या गतीवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळेच प्राप्त परिस्थितीत देशात 'सीएए' लागू करणे हे आव्हान आहे. नितीशकुमार यांनी यापूर्वीच त्याला विरोध केला आहे. मतदारसंघांच्या सीमांकनाबाबतही बराच काळ चर्चा सुरू आहे मात्र 'एनडीए'च्या अनेक घटक पक्षांचा याला पाठिंबा नाही. अशा परिस्थितीमध्ये मोदी यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्पही रखडण्याची शक्यता आहे. याशिवाय 'वन नेशन वन इलेक्शन'बाबत समितीने अहवाल सादर केला असून मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळातील ही सर्वात मोठी प्राथमिकता मानली जात आहे. सध्या ४७ पैकी ३२ पक्ष समान नागरी कायद्याला पाठिंबा देत आहेत. पण नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू भाजपची विचारधारा स्वीकारू शकतील का, हा मुख्य प्रश्न आहे. तसे न केल्यास ही दोन्ही विधेयके मंजूर होणे अवघड आहे.

आता भाजपसमोर केवळ आपल्याला अपेक्षित प्रकल्प पूर्ण करण्याचे आव्हान आहेच, पण मोठी गोष्ट म्हणजे नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू हे दोघेही आपापल्या राज्यांसाठी विशेष पॅकेजची मागणी करत आहेत. आधी याच मुद्यावरही ते 'एनडीए'पासून वेगळे झाले होते. आता मात्र ते 'किंगमेकर'च्या भूमिकेत असल्याने मोदींवर वाढता दबाव आहे. याशिवाय नितीशकुमार यांना जात जनगणना करायची आहे, मात्र भाजपचा त्याला विरोध आहे. आता आघाडी सरकारमध्ये या मुद्यावरही दबावाचे राजकारण पहायला मिळू शकते. अर्थात असे असले तरी आव्हानांचा सामना कसा करायचा हे पंतप्रधानांना चांगलेच माहीत आहे. नायडू आणि नितीशकुमार यांनी संसदीय पक्षाच्या नेत्याची निवड करताना दिलेल्या संदेशावरून सर्व काही निश्चित असल्याचे स्पष्ट होते. त्याच वेळी विरोधकही आक्रमक, दमदार आणि मजबूत विरोधी पक्षाची भूमिका बजावण्याचा संदेश देत आहेत. त्यामुळे पुढील कार्यकाळात पंतप्रधानांना या आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे. मित्रपक्षांशिवाय सत्ता चालणार नाही, हे पंतप्रधानांना नेहमीच लक्षात ठेवावे लागेल.

तिसरा पक्ष म्हणजे लोकजनशक्ती पक्ष (रामविलास पासवान गट). त्यात पाच सदस्य आहेत. मोदींना या पक्षांचे नेते आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांनाही महत्त्व द्यावे लागेल. केंद्रीय मंत्रिमंडळात गृह, अर्थ, संरक्षण आणि परराष्ट्र ही चार प्रमुख खाती आहेत. मित्रपक्ष यातील कोणत्याही विभागाची मागणी करू शकले नसले आणि ती भाजपकडे राहिली असली तरी या मंत्रालयांनी आपले प्रस्ताव मान्य करावेत, भाजपला पटत नसली तरी आपण आग्रह करत असलेली कामे व्हावीत म्हणून आग्रही राहू शकतात. पंतप्रधानांनी आपल्या दोन कार्यकाळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हेतूनुसार हिंदुत्वाच्या मुद्याला धार दिली. त्यांनी पुढील शंभर दिवसांच्या कामाचा अजेंडा तयार करुन ठेवला. पण आता त्यातही बदल करावा लागू शकतो. अल्पसंख्याकांच्या प्रश्नावर पंतप्रधानांना आता बेधडक पावले उचलता येणार नाहीत. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, राजस्थान आणि बिहारमध्ये राजकीय-सामाजिक समीकरणाचे आव्हान वाढले आहे. काही महिन्यांनी दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. तिथे चांगली कामगिरी बजावण्याचे आव्हान आहे. पंतप्रधानांनी लष्करातील अग्निवीर भरती योजनेचे वर्णन 'परिवर्तनवादी' असे केले होते. परंतु त्याला काही ठिकाणी बराच विरोध होत आहे. त्याचा आढावा घेण्यासाठी मित्रपक्षही दबाव आणत आहेत. अशा परिस्थितीत मोदी काय करतात, हे पहावे लागेल.

आजकाल

# भारतीय अर्थव्यवस्थेची वस्तुस्थिती

संजीव चांदोरकर

प्रो अरुणकुमार हे देशातील आर्थिक प्रश्नांचे एक प्रमुख भाष्यकार राहिले आहेत; ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोशिएशन ने त्यांचे एक व्याख्यान मागच्या आठवड्यात मुंबईत आयोजित केले होते; प्रो अरुणकुमार यांनी नोंदवलेली काही अर्थ-निरीक्षणे:

भारत सरकार प्रसृत करत असलेल्या डेटामध्ये नेहमीच खोट राहिलेली आहे; जीडीपी, महागाई निर्देशांक, मल्टी डायमेन्शनल पॉव्हर्टी, व्यापारातील तूट, काळा पैसा इत्यादी.

अ) अर्थव्यवस्थेतील काळा पैसा कमी झाला तर सर्वप्रथम देशातील टॅक्स/जीडीपी रेशो वाढेल, तो वाढत नाहीये;

ब) जीडीपी मध्ये संघटित क्षेत्राचा ५५% वाटा आहे आणि ते ६% रोजगार तयार करते; असंघटित क्षेत्राचा वाटा ४५% आहे आणि ते ९४% रोजगार पुरवते. या ९४% क्षेत्राचा डेटा शास्त्रीय पद्धतीने गोळाच केला जात नाही. ज्यात अर्थात शेती क्षेत्र देखील येते.

क) प्रत्यक्षात फक्त संघटित क्षेत्र वाढत आहे, आणि असंघटित क्षेत्र आक्रसत आहे; ते जेम्स धरले तर देशाची जीडीपी ८% नव्हे.

फक्त २% वाढलेली असेल

ड) जागतिक बँक / नाणेनिधी भारताच्या जीडीपीला सर्टिफिकेट देतात, कारण त्या संस्था स्वंत्रतपणे डेटा गोळा करत नाहीत; त्या भारत सरकारचाच डेटा वापरतात.

भारताचा मुख्य प्रश्न मॅन्युफॅक्चअरिंग क्षेत्राचा आहे; जागतिकीकरणात स्पर्धा करायची तर त्याची स्पर्धात्मकता / उत्पादकता वाढवावी लागेल, त्यासाठी संशोधनांवर (आर अँड डी) खूप खर्च करावा लागेल,

अ) व्यापार करारात भारताने अंग काढून घेतले कारण आपल्याला हे कळले कि चीनशी आपण स्पर्धा करू शकत नाही;

कारण तंत्रज्ञानात आपण तुल्यबळ नाही.

ब) भारत संशोधनावर जीडीपीच्या फक्त ०.७ % खर्च करते तर चीन त्याच्या जीडीपीच्या ३ %. पण चीनची जीडीपी भारताच्या जीडीपीच्या ५ पट आहे, म्हणजे डॉलर्स टर्म्स मध्ये चीन भारतापेक्षा २० पट जास्त रक्कम संशोधनांवर दरवर्षी खर्च करते.

जीएसटी मध्ये छोट्या / मध्यम क्षेत्रातील युनिट्सना सूट दिली आहे खरी पण त्यांच्याकडून जे माल विकत घ्यायचे त्यांना टॅक्स क्रेडिट मिळत नाही आणि त्या खरेदीदारांवरचं जीएसटीचे ओझे वाढते ; त्यामुळे खरेदीदार असंघटित क्षेत्रापेक्षा जीएसटी देणाऱ्या संघटित क्षेत्रातील उत्पादक/पुरवठादाराकडून वस्तुमाल खरेदी करणे पसंद करतो.

त्यामुळे पूर्वी जो वस्तुमाल असंघटित क्षेत्रातील युनिट्स पुरवत होती त्यांचा धंदा आपसूक संघटित क्षेत्राकडे गेला आहे/जात आहे.

केंद्र सरकारची आर्थिक धोरणे उत्पदकांना विविध सवलती देऊन बाजारात वस्तूंचा पुरवठा वाढवण्यासाठी आहेत (सप्लाय साईड); आणि या साऱ्या सवलती संघटित क्षेत्रासाठी असतात

पण आपल्या देशातील आर्थिक अरिष्ट मालाला पुरेशी मागणी नसल्यामुळे (डिमांड साईड) आले आहे

देशातील संघटित क्षेत्र त्यांच्याकडील फक्त ७० % ते ७५ % उत्पादन क्षमता वापरत आहेत; कारण मागणी नाही म्हणून. त्या क्षमतेचा वापर वाढल्याशिवाय कोण खाजगी उद्योजक नवीन गुंतवणुकी हातात घेईल.

देशातील मोठ्या होत असणाऱ्या कंपन्या, अस्तित्वात असणाऱ्या स्पर्धक कंपन्यांना विकत घेऊन मोठ्या होत आहेत;

देशात ६००० मोठ्या कंपन्या आहेत, ६ लाख मध्यम आकाराच्या आणि ६ कोटी मायक्रो/सूक्ष्म आकाराच्या; आर्थिक धोरणे या छोट्या व्यावसायिकांसाठी आखली पाहिजेत, त्यातून त्यांचा धन्दा वाढेल पण देशांतर्गत मागणी देखील वाढेल.

वरील मुद्दे फक्त एक झलक आहे; पूर्ण व्याख्यान खाली दिलेल्या युट्युब लिंक वर आहे.

प्रो अरुणकुमार सारख्या विद्वानांचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे, छोटी छोटी आकडेवारी, घटनाक्रम, संदर्भ देत एवढ्या कमी वेळात एवढा मोठा आशय कव्हर करणे.

हे फक्त त्यांच्या विषयासंदर्भात नाही. व्याख्यानाच्या आधी वेळ होता म्हणून काही जणांबरोबर अरुणकुमार यांच्याशी गप्पा मारत होतो. विषय अर्थातच लोकसभा निवडणुकांचा होता. जाणवले हे कि दिल्लीत राहून, म्हटले तर ते काही प्रोफेशनल सेफॉलॉजिस्ट नाहीत तरी देखील, त्यांना महाराष्ट्रातील राजकीय घटना, तेथील पक्ष, नेत्यांची नावे जिभेवर होती.

## लोकसंसद

### एस टी महामंडळाचे कौतुकास्पद पाऊल...



आजपर्यंत विद्यार्थ्यांना शाळेत एस टी ने जाण्यासाठी पाससाठी एस टी च्या जवळील डेपोमध्ये जावे लागत असे. त्यासाठी कित्येक वेळा विद्यार्थ्यांना शाळा बुडवावी लागे. शिवाय जेथे पास वितरित होतात अशा ठिकाणी जावे लागत असे. साहजिकच यात पैशाची व वेळेची हानी होत असे. केवळ ३३ टक्के रक्कम भरून विध्यार्थांना मासिक प्रवास पास काढता येतो. याशिवाय शासनामार्फत बारावी पर्यत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत पासचे वितरण केले जाते. आता या पाससाठी विद्यार्थ्यांना एस टी च्या डेपोमध्ये जावे लागणार नाही. एस टी पास थेट तुमच्या शाळेत ही नवी योजना सरकारने आणली आहे .ही मोहीम एस टी प्रशासनातर्फे दिनांक १८ जून पासून राबविण्यात येणार आहे. शाळेतच विद्यार्थ्यांना पासची व्यवस्था केली जाणार आहे. एसटीची ही योजना विद्यार्थ्यांचा वेळ व पैसा वाचविणारी आहे. याबद्दल एस टी महामंडळचे आभार. एस टी महामंडळाचे हे पाऊल कौतुकास्पद आहे.

**- शांताराम वाघ**, पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१८ जून**

**१८६१ :** पत्रकार संपादक कादंबरीकार श्री.भि. सरदेसाई यांचा जन्म १८६१ साली झाला. फॉरेस्ट्री कोर्स पूर्ण झाल्यावर त्यांनी सरकारी वनखात्यात नोकरी पत्करली. तथापि, गोऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी न पटल्याने त्यांनी नोकरी सोडली. यानंतर 'पुणे वैभव'चे संपादक झाले. पण येथेही न पटल्याने सांगली व कोल्हापूर येथे काही काळ शिक्षक म्हणून काम केले. कोल्हापूर नगरपालिकेचे एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणूनही काही काळ त्यांनी काम केले. याशिवाय 'नाट्यकथार्णव' या मासिकाचे आणि 'राष्ट्रमन' या साप्ताहिकाचे संपादक म्हणूनही काम केले. भाषांतरित कादंबऱ्या या प्रकाशनासाठी 'कादंबरीकल्प' नावाचे मासिक त्यांनी काढले. **१८९४:-** कादंबरीकार गंगाधर रामचंद्र साने यांचा जन्म. महाराष्ट्र साहित्य सेवक ग्रंथमालेचे संपादक असणाऱ्या साने यांनी 'कमला', 'यमुना', 'मानवी हृदय' या सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्या. तसेच 'सायुज्यसोपान व भारत वर्षाचा धार्मिक इतिहास खंड १,२' या ग्रंथासह चार आश्रमांचे महव सांगणारा मुलांचा मार्गदर्शक हा ग्रंथ, 'तरुणांचा तांडेल', 'विवाहितांचे नक्षत्रदर्शन', 'प्रौढांचे प्रबोधन' ही पुस्तके लिहिली. **१८९६:-** नाटककार, निबंधकार आणि 'विश्वेश्वर' या टोपणनावाने लिखाण करणारे विनायक आत्माराम पाठारे यांचा जन्म. 'निर्भीड, संदेश, नवी माज' या तत्कालीन नियतकालिकातून त्यांचे 'विवाहविधीची कुतरओढ', 'हिंदूसमाज आणि पतीत स्त्रियांची सुधारणा', 'पितृपक्षातील पितरांचे पिंड' हे लेख गाजले. याशिवाय त्यांनी पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास आणि गजानन गोविंद यांचे चरित्र लिहिले. त्यांनी आपल्या लिखाणातून तत्कालीन समाजाचे दोष वेशीवर टांगले. पुरोगामी विचार आणि सडेतोड भाषा यामुळे त्यांचे लेखन त्याकाळी खळबळजनक आणि वादग्रस्त ठरले. **१८९९:-** तत्त्वज्ञ, विचारवंत, साहित्यिक शंकर त्र्यंबक तथा दादा धर्माधिकारी यांचा जन्म. 'सर्वोदयदर्शन', 'गांधीजी : एक दर्शन', 'क्रांतिनिष्ठा', 'आपल्या गणराज्याची घडण', 'पाकिस्तानी वृत्तीचा प्रतिकार' अशी प्रेरक पुस्तके त्यांनी लिहिली होती. **१९०१:-** मराठी ग्रंथकार, संपादक रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे निधन. इंग्लंडच्या धर्तीवर मराठीत मासिक निघावे या विचाराने विविध ज्ञानविस्ताराची स्थापना झाली. त्याचे गुंजीकर पहिले संपादक. त्यात त्यांनी लिहिलेले लेख पुस्तक रुपात प्रसिद्ध. याशिवाय त्यांच्या स्वतंत्र ग्रंथरचनेत 'मोचनगड' ही ऐतिहासिक कादंबरी. 'अभिज्ञान शांकुतल', 'गोदावरी' तसेच 'शेक्सपिअरच्या रोमिओ व ज्युलिएटचे भाषांतर 'रोमकेतुविजया', 'सुबोध चंद्रिका' ही भगवत्गीतेवरील मराठी टीका याशिवाय त्यांचे भाषा, व्याकरण, तिथि सुधारणा, लेखनशुद्धी आदी संबंधीचे चिंतन, अ. का. प्रियोळकर यांनी संकलित केले आहे. **१९२०:-** ललित लेखक, अनुवादक माधव कृष्ण पारधी यांचा जन्म. 'भारतीय सैन्यांच्या परंपरा', 'स्वातंत्र्याचा लढा', 'भारतीय वाद्य' ही त्यांची उल्लेखनीय पुस्तके प्रसिद्ध आहेत. **१९३५:-** लेखक प्राणीशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ.भास्कर गणेश जोशी यांचा जन्म. त्यांनी 'जीवशास्त्र प्रवेश' हे विद्यार्थ्यांसाठी तर 'जीवशास्त्र' हे शिक्षकांसाठी पुस्तक लिहिले. **१९४२:-** मराठीतील अद्भुत-कल्पनारम्य कादबऱ्यांचा प्रभाव कमी व्हावा या ईर्षेपायी उत्तम माहितीपर पुस्तकांची भाषांतरे करणारे श्रीनिवास भिकाजी सरदेसाई यांचे निधन. सरकारी नोकरी सोडून ते मराठी लेखनाकडे वळले, वृत्तपत्रांत कामे करुन त्यांनी भाषांतरित कादबऱ्यांच्या प्रकाशनासाठी 'कादंबरीकल्प' हे मासिक काढले होते. **१९५०:-** साहित्यिक डॉ. श्रीकांत मधुसूदन गोडबोले यांचा जन्म. यांच्या प्रकाशित ग्रंथसंपदेत 'मोलकरीण', 'येता घरा', 'नाटक झाले पाहिजे', 'प्रॉब्लेम! प्रॉब्लेम', मिळून 'सात एकांकिका', 'भाड्याने देणे आहे' आणि 'नॅन','ढिटूट आणि परीराणी' ही दोन नाटके तसेच 'स्पिरिट', 'युगद्रष्टा', 'प्रिझम', 'एक होता लाकूडतोड्या' हे चार कथासंग्रह अशी साहित्य संपदात्यांची आहे. **१९७४:-** कवी, गद्य गीतकार शंकर विष्णू साठे यांचे निधन. 'कुंजविहारी' या मासिकाचे संपादन ते करत असत. यांचे 'विहंगमाचे दाणे' ही लेखमाला त्या काळात लोकप्रिय होती. नवप्रभाचे संपादनही त्यांनी केले. 'मंजुषा', 'पदवी या दोन काव्यसंग्रहासह 'काजवे' हा लघुनिबंध संग्रह, 'भ्रष्ट देवालय', 'बाबांची शिस्त' या दोन नाटिका त्यांनी लिहिल्या. **१९९९:-** तब्बल ५२ कादंबऱ्या आणि ११०० हून अधिक कथा (किमान ९ कथासंग्रह प्रकाशित) लिहिणारे श्रीपाद रामकृष्ण काळे यांचे निधन. प्राचीन गुरुकुल परंपरेचे वेदविद्या व दशग्रंथाचे अध्ययन करणाऱ्या श्री. रा. काळे यांची पहिली कथा १९४९मध्ये 'स्वराज्य' मध्ये छापून आली. 'संधिकाल', 'पाय गुण', 'पासंग' मिळून ८,९ कथासंग्रह आणि 'एक धागा सुखाचा', 'पहारा', 'समर्पण' मिळून ५२ कादबऱ्या त्याच्या नावावर आहेत. तसेच 'बळवंत' या मासिकाच्या दिवाळी अंकाचे सातत्याने १५ वर्षे संपादन केले. **२०१३:-** दुर्मिळ साहित्य प्रकाशित करुन मराठी वाचकांची गरज भागवणारे लेखक 'वरदा प्रकाशन'चे हनुमंत अनंत उर्फ ह. अ. भावे यांचे निधन. त्यांनी स्वेट मार्टिन या ब्रिटिश लेखकाच्या बऱ्याच पुस्तकांचे अनुवाद करुन ते प्रकाशित केले. तसेच 'अभियांत्रिक', 'चित्रकला' या विषयांवरही त्यांनी लेखन केले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ जून

१) श्री. शांताराम नरहरि राउत आगरसुरे, अलिबाग, १८-६-१९४२
२)श्री.कैलास बळीराम बंदरी कोळीवाडा, अलिबाग, १८-६-१९५४
३)श्री.रोहिदास गंगाराम वासकर चेंढरे, अलिबाग १८-६-१९४२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**सोहम संदीप रावणकर , वाढदिवस, अलिबाग**

**विमल सॉ मिल, उचेडे, पेण**



**अमृतबेन व जिवराज प्रेमजी जैन, वाढदिवस अलिबाग**

# पालीतील प्रवाशांचा मनस्ताप

## रस्त्याच्या कडेला तिष्ठत उभे राहण्याची वेळ



**। पाली । वार्ताहर ।**

**रोह्यावरून सिल्लोडला जाणारी एसटी बस शनिवारी (दि.१५) तब्बल पावणेतीन तास उशिराने पालीत आली. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. यातच प्रवाशांना भर पावसात रस्त्याच्या कडेला तिष्ठत उभे राहून बसची वाट बघावी लागली. महिला, लहान मुले व वृद्ध प्रवासी यांचे खूप हाल झाले. त्यामुळे प्रवाशांनी संताप व्यक्त केला.**

रोहा-सिल्लोड एसटी बस रोह्यावरून सुटून पालीमध्ये सकाळी सात वाजताच्या दरम्यान येते. मात्र, ब्रेक डाऊन झाल्यामुळे ही गाडी पालीमध्ये पावणेदहा वाजता आली. त्यामुळे प्रवाशांचे खूप हाल झाले. रिझर्वेशन केलेल्या प्रवाश्यांना देखील कोणतीही माहिती परिवहन महामंडळाकडून देण्यात आली नाही. तसेच, ही बस पाली बस स्थानकात जात नसल्यामुळे पालीच्या बाहेर रस्त्यावर वाट पाहत उभे राहावे लागते. यामुळे प्रवाशांना बस बाबत कोणतीही माहिती मिळत नाही. काही प्रवासी बसची वाट पाहून कंटाळून इतर वाहनांचा आधार घेत पुढे गेले. मात्र, रिझर्वेशन केलेल्या प्रवाशांना हकनाक थांबून राहावे लागले. त्यातील काही प्रवासी नाईलाजाने पदारमोड करून इतर वाहनांनी पुढे गेले.

> बस ब्रेक डाऊन झाली आहे याची माहिती रिझर्वेशन केलेल्या प्रवाशांच्या मोबाईलवर कळवणे गरजेचे होते. ही माहिती मिळाली असती तर प्रवासी इतका वेळ ऊन-पावसात तिष्ठत उभे राहिले नसते. रोह्यावरून पाली मार्गे पुण्याकडे जाणाऱ्या सर्व बसेस पाली स्थानकात जात नाहीत, त्या बाहेर थांबतात. किमान या ठिकाणी रस्त्याच्या कडेला प्रवाशांसाठी प्रवासी शेड उभी करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रवाशांना ऊन वाऱ्यापासून संरक्षण मिळेल व बसता देखील येईल.
>
> – कल्पेश शहा, नागरिक, पाली,

### पाली बस स्थानकात गाड्या जात नाही

पाली बस स्थानकाची दुरवस्था झाली आहे. मागील चार वर्षांपासून बस स्थानकाचे नूतनीकरणाचे काम ठप्प आहे. त्यातच रोहा येथून पुणे व सिल्लोडला जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्या पाली बस स्थानकात न जाता पालीच्या बाहेरून जातात. परिणामी प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. त्यांना पालीच्या बाहेर येऊन बसची वाट पाहत उभे राहावे लागत आहे.

### अरुंद रस्ते, मोठ्या बस

यासंदर्भात रोहा बस स्थानकातील कर्मचाऱ्यांनी सांगितले की, रोहा-पुणे या हिरकणी बसेस तसेच रोहा-सिल्लोड ही बस लांब व मोठ्या आहेत. पालीतील अंतर्गत रस्ते हे अरुंद आहेत. तसेच, काही ठिकाणचे वळण मार्ग हे देखील छोटे व अरुंद असल्यामुळे बसला तेथून मार्गक्रमण करता येत नाही व अडचण येते. परिणामी पाली बस स्थानकात या गाड्या जात नाहीत.

# माहेश्वरी समाज रक्तदान शिबीर



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत माहेश्वरी समाज व श्री शनी महाराज देवस्थान समिती आयोजित समर्पण रक्तपेढी घाटकोपर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरात ६७ रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत खालापूर तालुक्यातील ४९६ वे रक्तदान शिबीर ठरले.

यावेळी योगेश राठी, संदेश भुतोडा, लालसिंह राजपुरोहित, गणेश डागा, राम राठी, पुष्पा चांडक, विमल डागा, अमित चांडक, मनेश सारडा, पुष्पा भुतोडा, डॉ. प्रशांत सदावर्ते, ॲड. योगेश देशमुख, चंद्रकांत डागा, मयूर डागा, हृषिकेश डागा, लखन राठी, शुभम पांडे, मितेश डागा, मीना प्रभावळकर, आमिर मणियार, महेंद्र कांबळे, विकास चित्ते, कैलाश पोटे, मजीद नेर्लेकर, पंडित मिश्रा, लालजी आदी उपस्थित होते.

# सरगमचा पदग्रहण समारंभ संपन्न




**। पनवेल । वार्ताहर ।**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमचा नवीन टीमचा पदग्रहण सोहळा नुकताच गोखले सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मल्टिपल कौन्सिल चेअरमन नितीन शेट्टी तर विशेष अतिथी म्हणून द्वितीय प्रांतपाल प्रवीण सरनाईक उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नवीन अध्यक्ष म्हणून मानदा पंडित याना शपथ देण्यात आली. तर, सचिवपदी प्रेमेंद्र बहिरा, खजिनदार धवल शहा, आणि इतर सभासदांनी विविध पदांसाठी शपथ घेतली.

मानदा पंडित यांनी क्लबच्या अध्यक्ष म्हणून निवड केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आणि दरवर्षीच्या उपक्रमांसोबत नवीन व्हिजन सेंटर, अन्नदान सारखे उपक्रम घेणार असल्याचे सांगितले. तसेच, प्रवीण सरनाईक यांच्या हस्ते मधुरा राजीव, आदित्य दोशी, प्रकाश भारद्वाज आणि हिमांशू कुलकर्णी या नवीन सभासदांना क्लबच्या सभासदत्वाची शपथ दिली. यावेळी स्वाती गोडसे यांनी मागील वर्षी उत्तम काम केल्याबद्दल संविदा पाटकर, अलकेश शहा, सुयोग पेंडसे, संजय गोडसे, प्रेमेंद्र बहिरा, जयेश मणियार, धवल शहा, प्रदीप भट्टाचार्य, मधुरा राजीव, सुनील देशपांडे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. तसेच, मानदा पंडित यांना लायन ऑफ द इयर या विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला मुकेश तनेजा, मोहिनी तनेजा, विजय गणात्रा, सत्यपाल चुघ, भावना रुईया, संजय रुईया, संदीप म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

# ऑक्सिजन पार्कमध्ये वृक्षारोपण



**। उरण । वार्ताहर ।**

सारडे विकास मंचच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये सारडे विकास मंच, सदाबहार दोस्ती प्रतिष्ठान उरण, श्री नंदाई प्रतिष्ठान वशेणि, सुयश क्लासेस आवरे तसेच अनेक निसर्गप्रेमींच्या मदतीने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या उत्साहात वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी रमेश म्हात्रे, देवेंद्र पाटील, प्रसाद पाटील, हिराचंद पाटील, संतोष जोशी, हरिश्चंद्र म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, हरीश म्हात्रे खोपटे, निवास गावंड, संतोष मोकळ, संतोष खंडागळे आदिंच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला.

# पनवेलमधील फेरीवाल्यांचे अतिक्रमण



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरासह परिसरातील अनेक मुख्य रस्त्यावर गेल्या काही महिन्यापासून फेरीवाल्यांचे अतिक्रमण वाढले असून या अतिक्रमणाकडे नवनिर्वाचित आयुक्त मंगेश चितळे यांनी लक्ष घालून कारवाई करावी, अशी सर्वसामान्य पनवेलकरांची मागणी आहे.

पनवेल शहरातील मार्केड यार्ड परिसर, भाजीमार्केट, मोहल्ला परिसर, लाईन आळी, रोज बाजार, उरण नाका परिसर याच्यासह बहुतांश परिसरात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय व्यावसायिकांनी घुसखोरी करून त्यांच्या हातगाड्या तसेच काही खाजगी जागेवर व्यवसाय सुरू केले आहेत. अशाच प्रकारे कामोठे, कळंबोली, खारघर, खांदा वसाहत, नवीन पनवेल येथील सिडकोच्या राखीव भूखंडावर मासळी, मटण, चिकन तसेच फळ विक्रेत्यांनी अतिक्रमण करुन व्यवसाय करायला सुरुवात केली आहे. सिडको आणि पनवेल महापालिकाद्वारे कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्यामुळे फेरीवाल्यांनी थेट रस्त्यावर अतिक्रमण करुन व्यवसाय थाटला आहे. रस्ते आणि पदपथावर अनधिकृत फेरीवाल्यांनी अतिक्रमण करुन व्यवसाय थाटल्याने परिसरातील रहिवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. येथील रहिवाशांनी महापालिकेकडे तक्रार करुनही कोणत्याही प्रकारची कारवाई अनधिकृत फेरीवाल्यांवर केली जात नसल्यामुळे नागरिकांद्वारे संताप व्यक्त केला जात आहे.

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोबाईल मिळाला परत

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील लाईन आळी येथे राहणाऱ्या तेजश्री मनीष साखरे या आजारी असल्यामुळे त्या हॉस्पिटलमध्ये गेल्या होत्या. यादरम्यान त्यांचा आयफोन १४ प्लस मोबाईल हा घरातून चोरीला गेला होता. या मोबाइलच्या चोरी बाबत पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. यावेळी वरिष्ठ पालीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, पोलीस हवालदार अमोल पाटील, मिथुन भोसले, विशाल दुधे आदींचे पथकाने तांत्रिक तपास सुरू करून हा मोबाईल पनवेल कोळीवाडा येथील एका निर्जन ठिकाणी झुडूपांमध्ये सापडला. त्यानंतर हा मोबाईल आवश्यक त्या कायदेशीर बाबी पूर्ण करून तो तेजश्री यांना पुन्हा सुपूर्द करण्यात आला.

# शासनाची चार लाखांची मदत



**। खरोशी । प्रतिनिधी ।**

वादळी वाऱ्याच्या पावसात झाडाची फांदी कोसळून पेण तालुक्यातील नाईकवाडी येथील यश चंद्रकांत नाईक (१७) यांचा मृत्यू झाला होता. घटनास्थळी शासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. शासन स्तरावर या कुटुंबीयांना मदत मिळावी यासाठी मंगेश दळवी, रुपेश दळवी यांनी पाठपुरावा करत, या कुटुंबांना चार लाख रुपयांची मदत मिळवून दिली. यावेळी नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्यासोबत मंगेश दळवी, रुपेश दळवी, सरपंच गजानन मोरे, सुरेश पवार, दत्ता पवार, स्नेहल पाटील, महेश भोईर, हरेश दळवी, जनार्दन वारगुडे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नील हॉस्पिटलमध्ये योग दिवस साजरा

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीन पनवेल येथील नील हॉस्पिटल येथे गर्भवती महिला व इतरांसाठी आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त योग शिबीर आयोजित करण्यात आले होते. अनेक गर्भवती महिला व इतरांनी या योग शिबिराचा आनंद घेतला.

आंतरराष्ट्रीय योग दिवस दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जातो. या वर्षी १० वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जाणार आहे. प्रसिद्ध स्त्रीरोग व गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ. शुभदा नील यांनी गर्भवती महिला व सर्वांकडून संगीतमय योग व मेडिटेशन करवून घेतले. तसेच, फादर्स डे साजरा करताना त्यांनी सर्वांना विश्व पिता परमात्म्याचा परिचय दिला. नील हॉस्पिटल येथे दर शनिवारी संध्यकाळी ५ ते ६, तर रविवारी ३ ते ४ या वेळात योग शिबीर. सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत गर्भसंस्कार, मेडिटेशन शिबीर मोफत घेण्यात येते. या मोफत योग, मेडिटेशन व गर्भसंस्कार शिबीराचा लाभ जास्तीत जास्त गर्भवती महिलांनी व इतरांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. शुभदा नील यांनी केले आहे.



# झुलेलाल ट्रस्ट रक्तदान शिबीर



**। पनवेल । वार्ताहर ।**

श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, आम्ही रक्तदाते पनवेलचे, पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट आणि एमजीएम हॉस्पिटल कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन पनवेल येथील पूज्य श्री सिंधी पंचायत हॉल येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी ७५ जणांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पनवेल मधील डॉक्टर ययाती गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजू सचदेव, दौलत सचदेव, ॲड. मनोहर सचदेव, देवानी, ॲड. अमोल साखरे, मुलरीधर डाके, भूषण चोणकर इत्यादी उपस्थित होते.

# सासरवाडी आस्वादगृहाचे उद्घाटन



**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्रीयन पदार्थांचा आस्वाद घ्यायचा असेल तर खास खवय्यांसाठी सीवूड्स व बेलापूर शाखेनंतर आता खारघरमध्ये सुद्धा आपली तिसरी शाखा घेऊन सासरवाडी हे आस्वादगृह सेवेत रुजू झाले आहे. फारच कमी वेळात लोकप्रिय झालेले हे आस्वादगृह शनिवारपासून खारघरमध्ये जिभेचे चोचले पुरवण्याकरिता उपलब्ध झाले आहे. यावेळी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या हस्ते सासरवाडी रेस्टॉरंटचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. उद्घाटनाप्रसंगी पत्रकारांशी संवाद साधताना प्राजक्ता माळी हिने सांगितले की, सासरवाडी रेस्टॉरंटच्या तिसऱ्या शाखेचे उद्घाटन होत आहे. यातच आपण समजून घ्या की बाकी शाखा जोमात सुरू आहेत. यातच यश दडलेले आहे. मी दुसऱ्यांदा उद्घाटनाप्रसंगी उपस्थित राहिले. यापूर्वी सुद्धा माझ्या हस्ते याआधीच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले होते. यात मला एक कलाकार म्हणून आनंद वाटतो.

# शुक्लतीर्थाकडे जाणाऱ्या पायऱ्यांची दुरवस्था

## हरेश्वर ग्रामपंचायत, देवस्थान ट्रस्टचे अक्षम्य दुर्लक्ष

***। हरिहरेश्वर । वार्ताहर ।***

***दक्षिणकाशी तीर्थक्षेत्र हरिहरेश्वर परिसरातील शुक्लतीर्थाकडे जाणाऱ्या पायऱ्यांची अंत्यत दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या पायऱ्यांच्या दुरुस्तीच्या कामांकडे ग्रामपंचायत आणि देवस्थान ट्रस्ट यांनी पुर्णपणे दुर्लक्ष केले असल्याने स्थानिक नागरिक, भाविक आणि पर्यटकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे.***



*भारतातील दक्षिणकाशी तीर्थक्षेत्र म्हणून हरिहरेश्वर प्रसिद्ध असुन या ठिकाणी महाराष्ट्र शासनाचे पर्यटन केंद्र असल्याने हजारो भाविक आणि पर्यटक या परिसराला भेट देत असतात. सावित्री, गायत्री, कृष्णा, कोयना आणि वेण्णा या पंच नद्यांचे पवित्र जल हरिहरेश्वर येथील समुद्राला एकत्र मिळते ते ठिकाण शुक्लतीर्थ म्हणुन ओळखले जात असुन त्याची पौराणिक माहिती स्कंद पुराणात नमुद आहे. काशी क्षेत्राप्रमाणे हरिहराच्या डोंगराभोवती शुक्लतीर्थ धरुन प्रदक्षिणा घालण्याची प्रथा आहे. येथील अथांग पसरलेला समुद्र आणि फेसाळणाऱ्या लाटा यांचे विलोभनिय दृश्य पहाण्याकरीता आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या विष्णुपद, गायत्रीतीर्थ आणि शुक्लतीर्थाचे दर्शन घेण्याकरीता भाविक आणि पर्यटक या परिसराला आवर्जुन भेट देत असतात. शुक्लतीर्थाकडील पायऱ्यांच्या कामाचा विकासकामात समावेश असताना शासनाने याकामाकडे पाठ फिरवल्याने या पायऱ्यांची वाट अत्यंत बिकट झाली आहे. पायऱ्या जागोजागी तुटलेल्या अवस्थेत असुन मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे भाविक आणि पर्यटकांना पायऱ्या चढ-उतर करताना दमछाक करत अपघाताचा सामना करावा लागत आहे. पायऱ्यांवर पाय ठेवण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.*

*यावेळी डोंबिवली येथील पर्यटक व कायद्याचे विदयार्थी प्रसाद पवार यांनी मंदिर परिसर, समुद्रकिनारी आणि ग्रामपंचायत परिसरातील अस्वच्छता व असुविधेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविक आणि पर्यटकांकडुन हरेश्वर ग्रामपंचायत पर्यटक प्रवेश कर म्हणुन ५ रुपये वसुल करत आहे. तसेच हरेश्वर देवस्थान ट्रस्टला ही भाविकांकडुन मोठया रक्कमांच्या देणग्या मिळत असतात. मात्र, हरेश्वर ग्रामपंचायत व हरिहरेश्वर देवस्थान ट्रस्ट यांनी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी गरजेच्या असणाऱ्या सोईसुविधांकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिक, भाविक आणि पर्यटक यांनी व्यक्त केल्या आहेत.*

**निवडक**

## उपसरपंचपदी जगन्नाथ चव्हाण

**रसायनी :** वावेघरच्या उपसरपंचपदी शिवसेना (उबाठा) पक्षाचे जगन्नाथ चव्हाण यांची निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल माजी आमदार मनोहर भोईर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी रघुनाथ पाटील,विष्णू लहाने, ज्ञानेश्वर माळी, सरपंच मिताली गाताडे, सदस्य दीपक बरवी, भावेश माळी, अमृता माळी, शालू चव्हाण, निशा घरत, दीपक म्हात्रे, शिवाजी माळी, प्रताप हातमोडे, महेंद्र गायकर, निलेश बाबरे, विलास राजगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मनसेकडून आंदोलनाचा इशारा

**रसायनी :** खानेआंबिवली येथील प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे पिल्लई कॉलेजच्या विरोधात ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे. पिल्लई कॉलेज बांधत असताना खानेआंबिवली येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी गावातील तरूणांना रोजगार व प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी मागणी केली होती.त्यावेळी प्रशासनातर्फे सकारात्मक चर्चा झाल्याचे मनसेचे वासांबे विभाग अध्यक्ष विनोद शिंदे यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांचा केला सन्मान

**रसायनी :** कुंभार समाज सामाजिक संस्था खालापूरच्या वतीने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अनंत महाडकर, प्रतिभा वाडेकर, शरद कुंभार तसेच सर्व कार्यकरिणीच्या मार्गदर्शनाखाली दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला.याप्रसंगी राजेंद्र साळवी, स्वप्निल नागावकर, संजय शिर्के, जयेश पनवेलकर तसेच खालापूर तालुक्यातील नऊ गावांमधील गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.

## सत्संग सभा संपन्न

**उरण :** बीएपीएस संस्थेचे कार्यकर एक अविभाज्य अंग आहे. बीएपीएस संस्थेच्या कार्यकर नियुक्तीला ५० वर्षे पूर झाले. याचे औचित्य साधून उरण तालुक्यातील मोरा गावातील ११ कार्यकर यांची निवड करून त्यांना नुकताच स्वामी नारायण संस्था मुंबई येथून आलेले देव वल्लभ स्वामी व अक्षर वल्लभ स्वामी यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. स्वामी नारायण सत्संग सभा मोरा येथे दत्त मंदिरात गेली २९ वर्षापासून सत्संग सभा होत आहे.

## प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात

**उरण:** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवरे येथे शाळा प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बबन पाटील, निर्भय म्हात्रे यांनी नवगतांचे स्वागत औक्षण व गुलाब फुल देऊन केले. यावेळी पहिलीत २० विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश नोंदविला.याप्रसंगी देविदास म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तके व वह्या वाटप केल्या. यावेळी प्रभाकर म्हात्रे, डी.ए.गावंड, राजेश गावंड, देविदास गावंड, शंकर पाटील, प्रमोद म्हात्रे, ज्योती ठाकूर उपस्थित होते.

# पब-बारवर सीसीटीव्हीची नजर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यातील सर्व पब, बार-रेस्टॉरंटवर उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर असणार आहे. पब, बारमध्ये एआय प्रणालीचे सीसीटीव्ही बसविण्याचे आदेश राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिले आहेत. या सीसीटीव्हीमुळे गैरप्रकारावर आळा घालणे शक्य होणार आहे.**

पुणे पोर्शे हिट ॲण्ड रन प्रकरणानंतर पुण्यासह राज्यभरात पब-बारमध्ये अल्पवयीन मुलांना सहज मद्य मिळत असल्याने सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या घटनेनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने राज्यातील सर्व पब, रेस्टॉरंट- बारवर नजर ठेवण्यासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. यामध्ये पब, रेस्टॉरंट- बारमध्ये ग्राहकांच्या वयाची संपूर्ण चौकशी करावी. तसेच, पब- रेस्टॉरंट- बारमधील वेळेच्या बंधनाचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहे. विशेष म्हणजे, बार आणि पबमधील काऊंटरवर मद्य दिले जाते, त्या ठिकाणी किमान दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक केलेले आहे. तसेच, सीसीटीव्ही कॅमेरे एआय प्रणालीअंतर्गत असणे आवश्यक आहेत..सध्या शहरी भागात पब, रेस्टॉरंट- बार दीड वाजेपर्यंत तर ग्रामीण भागात अकरा वाजेपर्यंतच सुरू ठेवण्याची परवानगी आहे; मात्र, अनेक बार आणि पब रात्री दोन ते तीन वाजेपर्यंत सुरू असतात. त्याला या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने आळा बसणार आहे. वेळमर्यादा पाळली गेली नाही तर, कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त सीसीटीव्हीमुळे विभागाला अलर्ट मिळणार आहे, त्यामुळे अशा पब-बारवर कारवाई करणे विभागाला सोपे जाणार आहे.



### नवीन मार्गदर्शक तत्त्वे

- ग्राहकांच्या वयाची शंभर टक्के चौकशी
- वेळेच्या बंधनाचे काटेकोर पालन
- सीसीटीव्ही कॅमेरा बसवा
- पबच्या प्रवेशद्वारावर सीसीटीव्ही आवश्यक
- बार काऊंटरवर एआय प्रणालीयुक्त किमान दोन सीसीटीव्ही
- हॉटेलच्या ओपन टेरेसवर मद्यविक्रीला बंदी
- फॅमिली बार- रेस्टॉरंटमध्ये मद्यपान करणाऱ्या ग्राहकाच्या वयाची चौकशी करा.

### सीसीटीव्ही कॅमेऱ्यासाठी नियमावली

- एक महिन्यासाठी रेकॉर्डिंग साठवणे
- कॅमेरा इन्व्हर्टर सुविधेसह २४ तास कार्यरत असणे आवश्यक
- सीसीटीव्हीचा अक्सेस निरीक्षक, अधीक्षकांकडे असणार
- दोन मेगापिक्सेलचे रिझोल्यूशन
- इमेज डेटाच्या विश्लेषणासाठी एआय क्षमतेचे सॉफ्टवेअर

### आयुक्त कार्यालयात सर्व्हर कनेक्ट

**प्रत्येक बार आणि पबच्या एआय प्रणालीचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे सर्व्हर राज्य उत्पादन शुल्क विभागाचा नियंत्रण कक्षासोबत कनेक्ट असतील. सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे व्हिडीओ फिड विभागाच्या नियंत्रण कक्षात बघता येणार आहे.**

# नावाला पावसाळा झाळा मात्र उन्हाळ्याच्या!



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मरूड शहरात अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या पाऊस १० जुन रोजी रात्रीच्या दरम्यान १५४ मिमी पाऊस पडल्याने मशागत केलेल्या शेतात राब येऊ लागले. परंतु आज सात दिवस झाले तरी पावसाचा थेंब ही न पडल्याने त्यात सतत तापमानात वाढ होत असल्याने शेतातील आलेले राब करपण्याच्या स्थितीत दिसून येत आहे.या उकाड्याने नागरिक ही हैराण झाला आहे.नावाला पाऊस झळा मात्र उन्हाळ्याच्या बसत आहेत.

मुरूड तालुक्यात आज ही शेती हाच प्रमुख उदरनिर्वाहाचे साधन आहे. दरवर्षी भात पिकांची लागवड ३ हजार २०० हेक्टर क्षेत्रात भात पेरणी होतंय यामध्ये विविध प्रकारचे तांदूळ हेच प्रमुख पीक असते. पावसाने दडी मारल्याने पिकांची पेरणी पंचक्रोशी भागात झालेली दिसुन येत नाही. राब करपण्याच्या संभवाने दुष्काळाची चिन्हं दिसू लागल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. शेतकरी शेताच्या बांधावर बसून मेघराजाला येरे येरे पावसा तुला देतो पैसा अशी आर्त साद घालत आहे.

मुरूड पंचक्रोशी भागात जोरदार पाऊस पडल्याने शेतातील राब उगवायला सुरुवात झाली आहे. राब वाढण्यासाठी खतांची व पाण्याची गरज आहे. सध्या आठवडा झाला तरी पाऊस पडला नाही त्यामुळे शेतातील जमीन सुकीच आहे. जर पाऊस एक दोन दिवसात नाही पडला तर आलेला राब उन्हाने करपेल आणि हिरवी झालेली भात रोपे पिवळे पडतील. आधीच दुष्काळाला शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशी प्रतिक्रिया खार अंबोली येथील शेतकरी मनोज कमाने यांनी दिली.



● बकरी ईद हा मुस्लीम बांधवाचा पवित्र सण. पनवेल येथील ईदगाह दर्गा येथे मोठ्या प्रमाणावर मुस्लीम बांधव पार्थना करुन नमाज पठन केले.या नमाजमध्ये लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग होता. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# माणगाव तालुक्यात बकरी ईद साजरी

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव तालुक्यात सोमवारी (दि.१७)ईद-उल-अजहा म्हणजेच बकरी ईद सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवानी एकमेकांना गळाभेट आलिंगन देत बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच हिंदू बांधवांनीही मुस्लिम बांधवांची घरोघरी भेट घेऊन तसेच दूरध्वनीवरून बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. यादिवशी माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

माणगाव तालुक्यातील माणगाव, जुने माणगाव, नाणोरे, लोणशी, मोर्बा, निजामपूर, दहिवली, दहिवलीकोंड, तारणा, वडवली, साई, मांजरवणे, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, वणी, पुरार, हारकोळ आदी मोठी मुस्लीम वस्ती असलेल्या सर्व गावांतून बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली.



जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील मशिदीत हजारो मुस्लीम बांधवांनी सोमवारी सकाळी बकरी ईदची नमाज अदा केली. यावेळी मौलाना हाजीमिया जामदार यांनी कुराणाचे वाचन करून उपस्थित मुस्लिम बांधवाना बकरी ईदचे महत्व सांगितले. या बकरी ईदनिमित्त अनेक मुस्लीम बांधवांनी अल्लाहच्या नावाने बोकडाच्या कुर्बानी दिल्या.

माणगावनगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, नगरसेवक दिनेश रातवडकर, उद्योजक अरुण क्षिरसागर, शंकर शिंदे गुरुजी, उर्मिला शिंदे, सामाजिक कार्यकर्ते संजय साबळे, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, कल्पना पाखुर्डे, यशोधरा गोडबोले, एकता ग्रामीण क्रिकेट असोसिएशन माणगाव संस्थापक राहुल दसवते यांनी नमाज झाल्यावर मशीद ठिकाणी व घरोघरी जाऊन मुस्लिम बांधवांची भेट घेऊन त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच अनेक हिंदू बांधवानी प्रत्यक्षात भेटून व दूरध्वनीवरून मुस्लीम बांधवाना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# पेणमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी



**। पेण । प्रतिनिधी ।**

ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद म्हणजेच बकरी ईद हा सण मुस्लिम बांधव जगभरात साजरा करीत असतात. या दिवशी कुरणामधील बळीची घटना साजरी केली जाते. ईस्लामी काल गणनेतील अखेरेच्या महिन्याच्या १० व्या दिवशी बकरी ईद साजरी करण्यात येते. कुरबानीचा उत्सव म्हणून या ईदीला विशेष महत्व आहे. महत्वाची बाब म्हणजे यंदा एकादशी आणि बकरी ईद एकाच दिवशी आली आहे. त्यामुळे या सणाचा महत्व द्विगुणीत झाला आहे.

पेण येथील वरच्या मोहल्ल्यात सकाळी ८:३० वाजता नमाज अदा करण्यात आली. नमाज अदा केल्यानंतर एकमेकांना गळा भेट घेत ईदीच्या शुभेच्छा देण्यात आल्या तर खालच्या खाटीक मोहल्ल्यात दोन वेळा नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर शांतता कमिटीच्या सदस्यांनी सर्व मुस्लीम बांधवांना गुलाब पुष्प देऊन त्यांना ईदीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी डी.वाय. एस. पी. शिवाजी फडतडे, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, ॲड. मंगेश नेने, नगरसेवक संतोष पाटील, एल.के. म्हात्रे, जिल्हा शांतता कमिटी सदस्य वंदना पाटील, सदाशिव पवार, पायल सुर्वे यांच्यासह मोठ्या प्रमाणात शांतता कमिटीचे सदस्य हजर होते.

# विश्वकर्मा योजनेसाठी जेएसएसचे योगदान

**। रायगड । प्रतिनिधी ।**

कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालय भारत सरकारच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यामध्ये कार्यरत असणारी जन शिक्षण संस्थान रायगड या योजनेच्या माध्यमातून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

सहाण एकदंत नगर अलिबाग येथे भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाचे प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील बार्बर-न्हावी (असिस्टंट हेअर ड्रेसर) या पहिल्या व जेएसएसच्या पाचव्या बॅचचे उद्‌घाटन सहाण अलिबाग रायगड येथे संपन्न झाले. सदर योजनेत देश भरातील १००० पेक्षाही अधिक प्रधानमंत्री विश्वकर्मा सेंटरच्या माध्यमातून लाखो विश्वकर्मांना २०२८ पर्यंत मोफत व्यवसायाभिमुख कौशल्य वृद्धी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



सहा दिवसांच्या प्रशिक्षण वर्गांमध्ये प्रति विद्यार्थी एकत्रित प्रोत्साहन भत्ता ४ हजार रुपयांबरोबरच, मोफत प्रशिक्षण प्रमाणपत्र, प्रत्येकी १५ हजार रुपयांचे विश्वकर्मा किट अथवा व्हाउचर्स बरोबरच कौशल्य वृद्धी प्रशिक्षणासह ५ टक्के व्याजदराने तीन लाख रुपयापर्यंतची टप्प्याटप्प्याने कर्ज सुविधादेखील प्रशिक्षणार्थींना उपलब्ध होणार आहे अशी माहिती कार्यक्रमाच्या प्रसंगी जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय कोकणे यांनी व्यक्त केले. जे.एस.एस रायगडच्या माध्यमातून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना स्थानिक कारागिरांना सक्षम करणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी सदर योजनेचा फायदा घेऊन नाव नोंदणी करावी असे उद्‌गार कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे संचालक सदस्य नरेन जाधव यांनी व्यक्त केले. तर जेएसएस रायगड व प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात आत्मनिर्भर भारतसाठी पुढाकार घेत आहे असे मत अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी जन शिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ.नितीन गांधी, नरेन जाधव, संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे यांच्या समवेत प्रतिक्षा चव्हाण, प्रशिक्षक रिद्धी पाटील, अस्मिता भोईर आदी मान्यवर आणि प्रशिक्षणार्थींच्या उपस्थितीत उद्‌घाटन समारंभ उत्साहात पार पडला.

# कोकण विभाग पदवीधर मतदार संघासाठी यंत्रणा सज्ज

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

कोकण विभाग पदवीधर मतदार संघासाठी मुरूड तहसीलदार कार्यालय सज्ज झाला असून येत्या २६ जूनला निवडणूका होत असून त्याकरिता मुरूड तालुक्यात दोन मतदान केंद्र असून एक तहसीलदार दालन व दुसरे पुरवठा शाखा तहसीलदार या ठिकाणी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदाते आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

यंदा ही तालुक्यातून कोणत्याही राजकीय नेत्याने स्वारस्य न घेतल्याने ज्येष्ठ पदवीधर मतनोंदणी कमी होत चालली आहे. जे नवनिर्वाचित पदवीधर तरुणांनी सदरची नोंदणी स्वतःहून तसेच शालेय शिक्षकांकडून करण्यात आली आहे. राजकीय नेत्यांनी या मत नोंदणीसाठी प्रयत्न केले असते तर सदरचा आकडा हा सुमारे अडीच हजार पर्यंत पोहचला असता.परंतु हे होताना दिसत नाही.

मुरूड तालुक्यात चार हजार पेक्षा पदवीधर असू शकतात. परंतु सतत निवडणुकीच्या वेळी मतनोंदणी करण्याकरिता कागदपत्रांची जम वाजमव करावी लागत असल्याने हा आकडा कमी होत चालला आहे. एकदा मतनोंदणी झाली की, पुन्हा मतनोंदणीची गरज काय असा प्रश्न पदवीधर स्वप्नील कवळे यांनी केला. आमच्या पदवीचा मान राखून निवडणूक आयोगाने पदवीधरची कायम स्वरुपी नोंदणी करुन घ्यावी अशी मागणी स्वप्निल कवळे यांनी केली आहे.

## धूप प्रतिबंधासाठी फायदेशीर; जिल्हा प्रशासनाकडून प्रोत्साहन

# बांबू लागवड दरडग्रस्तांना ठरणार वरदान

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**तळिये आणि इर्शाळवाडी येथील दरड दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने बोध घेत दरड रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मातीची धूप रोखण्यासाठी बांबूच्या झाडाचा फायदा मोठ्या प्रमाणात होतो. जिल्ह्यातील दरडग्रस्त भागात बांबूची लागवड करण्यावर जिल्हा परिषदेने भर दिला आहे. बांबूपासून रोजगार निर्मितीला चालना मिळण्याबरोबरच भूस्खलन रोखण्यासाठी बांबूचा फायदा होणार आहे. त्यामुळे बांबू लागवड दरडमुक्तीसाठी एक वरदान ठरणार असल्याचे चित्र समोर येत आहे.**

गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमध्ये जिल्ह्यातील अनेक भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. इर्शाळवाडीत दरड कोसळून ८४ जणांना प्राण गमवावे लागते. अशाच घटना याआधी महाड तालुक्यातील तळिये, पोलादपूर, कर्जत तालुक्यातही घडल्या आहेत. दरड कोसळण्याच्या वाढत्या दुर्घटना लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत दरड रोखण्यासाठी बांबू लागवड केली. येथील डोंगरभागात सुमारे दोन लाख बांबूच्या रोपांची लागवड केली. बांबूची मूळ माती धरून ठेवतात. मातीची होणारी धूप थांबवण्यास बांबूची मोठ्या प्रमाणात मदत होते. हे लक्षात आल्यावर जिल्हा परिषदेने यात पुढाकार घेत जिल्ह्यातील गावे, वाड्यांच्या भागात बांबूची लागवड करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. बांबू लागवडीसाठी तालुका, ग्रामपंचायत स्तरावर स्वयंसेवी संस्था, स्वदेश फाऊंडेशन, रोटरी क्लब, लायन्स क्लब,



स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसहायता बचत गटातील महिला, गावातील महिला मंडळे, भजनी मंडळे व युवक यांचा लोकसहभाग घेतला जाणार आहे.

जिल्ह्यात सुमारे सात लाखांपेक्षा अधिक बांबूची बेटे तयार केली जाणार आहेत. बांबूचे आयुर्मान साधारणतः ३५ ते ४० वर्षांचे असते. बांबूची लागवड केल्यावर तीन ते चार वर्षांत उत्पादन मिळण्यास सुरुवात होते. जिल्ह्यातील काही तालुक्यात दरवर्षी अतिवृष्टी होते. दरड कोसळण्याची शक्यता अधिक असते. याला प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासनाकडून बांबू लागवडीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. रायगड ग्रामीण जिल्हा असल्याने जिल्ह्यात आजही बांबूपासून तयार होणाऱ्या वस्तूंना पसंती दर्शवली जाते. टोपली, सूप, झोपाळा, बांधकाम व्यवसाय, खुर्ची, आराम खुर्ची, डायनिंग सेट, सोपा सेट, टी पॉय, शो पीस, वॉटर फॉल, विद्यूत दिवे, बेड, ट्रॉली, परडी अशा अनेक प्रकारचे फर्निचर बनवण्याचे काम बांबूपासून केले जाते. वेगवेगळ्या ठिकाणी बांबूच्या गॅलरी उभ्या होऊ लागल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यात बांबूला महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यामध्ये बांबू लागवडीमुळे व्यवसाय वृद्धीला चालना मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

> **दरड रोखण्यासाठी बांबूची लागवड खूपच महत्त्वाची ठरते. बांबू जमिनीची धूप थांबवण्याचे काम करतात. कोकणातील जमिनीत बांबू लागवड चांगल्या प्रकारे होत असल्याने यातून स्थानिकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर बांबूची लागवड करण्यासाठी वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडून रोपे तयार करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे.**
>
> **- प्रसाद गायकवाड, वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, अलिबाग.**


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये** स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- **अलिबाग येथे हॉस्पिटलमध्ये कामासाठी** पुरूष कर्मचारी पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. डॉ.सरोज तांबोळी मेमोरिअल हॉस्पिटल-रामनाथ. डॉ.अतुल कोतेकर- ७७९८८८०७०४, प्रिया कर्णिक-९३७२२०४९७०
- **मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर** पाहिजे आहे. मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता** आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे बहिरोळे, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक बकुळा प्रफुल्ल आमीन व हरणा हंसराज ठक्कर यांचेकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे बहिरोळे, ता. अलिबाग जि. रायगड येथील भुमापन क ३२२, क्षेत्र ०-२१-९० हे.आर. पोटखराबा ०-०१-१० हे. आर. एकुण क्षेत्र ०-३३-०० हे. आर. आकार २.०५/- रू. पै. व सदर मिळकतीवर असणारे मौजे बहिरोळे मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील घर नं. १० सह

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी

कळावे,

सही / -

अलिबाग,
दिनांक- १७/०६/२०२४

**ॲड. प्रविण मधुकर ठाकूर**
पत्ता शितोळे आळी,
अलिबाग रायगड. ४०२ २०१
मो ९८२२०४८३३८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीने कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे बेलवली, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे ०.२०.२० क्षेत्राचे विद्यमान मालक श्री.जगन्नाथ पेढवी यांचेकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे बेलवली, ता. अलिबाग जि. रायगड येथील भुमापन क ३२५ /१, क्षेत्र ०-५८-१० हे. आर. पोटखराबा ०-०४-०० हे. आर. एकुण क्षेत्र ०-६२-१० हे. आर. आकार ११.३९/- रू. पै. हि मिळकत

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग,
दिनांक- १७/०६/२०२४

सही/-
**ॲड. प्रविण मधुकर ठाकूर**
पत्ता शितोळे आळी,
अलिबाग-रायगड. ४०२ २०१
मो ९८२२०४८३३८

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल इंशिता चंद्र रा.अंधेरी वेस्ट मुंबई यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकती तिचे मालक १) श्री. भरत आंबो म्हात्रे वगैरे १, रा. कोळखे, पनवेल. जि. रायगड २) कविता बलराज लंजिले रा. लातुर, ३)शिल्पा प्रमोद येनगे रा. अहमदाबाद गुजरात, यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे पोसरी ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| ६८/३अ | ०-२६-३० | ४-०५ |
| ६८/३ब | ०-२९-९० | ४-३० |
| ६९/२ | ०-१४-७० | ०-४० |
| ६९/३ | ०-५७-५० | २-२५ |
| ६९/५ | ०-२३-३० | ३-२० |
| ६९/६ | ०-२२-२० | ३-०० |
| ७१/२ | ०-३९-०० | ०-४० |
| ७१/३ | ०-३२-०० | ०-३५ |

सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विकी करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क , लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बॅक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक : १७/६/२०२४

सही/-
**ॲड. गीतांजली जी. फुलावरे**
कार्यालय पत्ता: ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं.३
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांकडून ठरलेली किंमत स्वीकारून रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करून देणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नांदगाव, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| २६/२/अ | ०-३७-९०<br>पो. ख ०-०२-५०<br>एकुण ०-४०-४० | ८.१३ | १. शिमगीबाई आत्माराम पोपेटा<br>२. पुष्पा जनार्दन चौधरी<br>३. जयाबाई नामदेव भगत<br>४. निर्मला रमेश म्हात्रे<br>५.कुंदाबाई कृष्णा पाटील<br>६. राधाबाई किसन पाटील<br>७. शैलेंद्र अनंत पाटील<br>८. जयदास अनंत पाटील<br>९. रूपेश अनंत पाटील<br>१०. सचिन अनंत पाटील<br>११. सुवर्णा यशवंत घरत<br>१२. छाया दत्तात्रेय पाटील<br>१३.अनिता दत्तात्रेय गायकर<br>१४. मधुकर रामचंद्र पाटील<br>१५. शशिकांत सावळाराम पाटील<br>१६.अनिल सावळाराम पाटील<br>१७. पद्मावती सावळाराम पाटील<br>१८. कमळाबाई रामचंद्र भोईर<br>१९. अनिता मधुकर पाटील<br>२०.बाळनाथ सिताराम म्हात्रे (मयत) तर्फे वारस<br>२०.१ विठाबाई बाळनाथ म्हात्रे<br>२०.२ वर्धमान बाळनाथ म्हात्रे<br>२०.३ तुषार बाळनाथ म्हात्रे<br>२०.४ महेश बाळनाथ म्हात्रे<br>२०.५ राहुल बाळनाथ म्हात्रे |

वर नमूद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक /कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार करतील व रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
**श्री. पराग प्रफुल्ल म्हात्रे**
ॲडव्होकेट हाय कोर्ट
व नोटरी भारत सरकार
११, केशव वसंत,
जुने तहसील कार्यालयासमोर, पनवेल,
ता. पनवेल जि. रायगड.
९८३३७३८७११

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) निलेश वसंत म्हात्रे रा. नागाव ता.अलिबाग,जि रायगड २)श्री. सम्राट चंद्रप्रकाश सिंग रा. मुंबई असून त्यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवलेला असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | १९०६ | ०-१८-२० | ३.०० |

सदर वर केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १६/०६/२०२४

सही /-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
पत्ता - शॉप नं.१०, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि. रायगड

## जाहीर नोटीस

कर्जत भात गिरण सहकारी प्रक्रिया संस्था लि., मु. पो. दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड या सहकारी संस्थेचा सन २०२४-२०२५ ते २०२८-२९ या कालावधीकरिता निवडणूक कार्यक्रम दि. १८/०६/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेचे नोटीस बोर्ड व मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यांत आलेला आहे. नामनिर्देशन अर्ज विक्री व स्विकृती तसेच नामनिर्देशन पत्राची छाननी व नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे ठिकाण हे मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड, पत्ता- कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार भवन, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड, कर्जत, जि. रायगड आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती दिनांक | नामनिर्देशन पत्राची छाननी स्विकृती दिनांक | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे दिवस | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निशाणी वाटप दिनांक | मतदान दिनांक, वेळ व स्थळ जाहीर दिनांक | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ व निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जत भात गिरण सहकारी प्रक्रिया संस्था लि; मु.पो. दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड | दि.१९/०६/२०२४ ते दि. २१/०६/२०२४ आणि दि. २४/०६/२०२४ ते दि. २५/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि. २६/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि.२७/०६/२०२४ ते दि.११/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि. १२/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि. २१/०७/२०२४ रोजी सकाळी ०८.०० ते सायं. ०४.०० वाजेपर्यंत (मतदानाचे ठिकाण नंतर प्रसिद्ध करणेत येईल.) | दि. २१/०७/२०२४ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यंत व निकाल जाहीर मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |

सही/-
**(सुनील किसन दांगट)**
निवडणूक निर्णय अधिकारी
कर्जत भात गिरणी सहकारी प्रक्रिया संस्था लि;
मु.पो. दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड

सही/-
**(बालाजी कटकदौंड)**
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. कर्जत, जि. रायगड

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. संतोष बाबाजी भोईर २) कु. ऋतिक संतोष भोईर, यानी मौजे नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| उबेदूर रहेमान अब्दुलरब शेख | २० | २ | ४-४३-००<br>यापैकी ०-२०-०० | २-९७ |

वरील मिळकती या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. १८/०६/२०२४.

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो. ९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९८५०७६७५६८

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत श्री. रंजन दिनकर पाटील, राहणार आगरसुरे, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. रंजन दिनकर पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपिभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चोंढी, (मुळ गाव बामणसुरे) ता. अलिबाग. | ११४ (जुना गट नं. २५०) | ०-१६-०० एकूण | १-०६ |

अलिबाग,
दिनांक : १८/०६/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत श्रीमती नंदिता प्रभु मेहरोत्रा, श्रीमती रिती कुलदिपसिंग जर्ग, श्री. रोहीत जितेंद्र वत्सा, राहणार मुंबई, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती नंदिता प्रभु मेहरोत्रा, श्रीमती रिती कुलदिपसिंग जर्ग, श्री. रोहीत जितेंद्र वत्सा, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपिभाग | क्षेत्र ( हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| झिराड, ता. अलिबाग. | २२०/१ (जुना गट नं. २९७/१) | ०-७१-८०<br>०-१८-२० पो.ख.<br>०-९०-०० एकूण | ६-६० |

अलिबाग,
दिनांक : १८/०६/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या बागायत मिळकती, मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| आवास, ता. अलिबाग | ७३०/१/अ | एकुण ०-१०-०० | ३.१० | रायल अलेक पदमसी |
| आवास, ता. अलिबाग | ७३०/१/ब | ०-२०-३०<br>पो ख ०-०३-९०<br>एकुण ०-२४-२० | ६.५० | १)रियल अलेक पदमसी<br>२) शाहजान अलेक पदमसी<br>३) कुआसर ताकर पदमसी |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख १७/०६/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे जिते, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.अरपित अरूण मेहरा | १०६/२६<br>१०६/३१ | २३६<br>२२० | २३-६०<br>२२-०० |

तरी, वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १८/०६/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांकडून ठरलेली किंमत स्वीकारून रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करून देणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३६/१ | ०-०८-९०<br>पो. ख ०-०१-००<br>एकुण ०-०९-९० | १.६९ | १. जानकु मुका पाटील<br>२. शंकर मारूती पाटील<br>३. वसंत मुका पाटील<br>४. राजेश मुका पाटील<br>५.मालती महादेव जळे<br>६. उषा नामदेव पाटील<br>७.प्रज्ञा विकास पाटील<br>८.लक्ष्मण मारुती पाटील (मयत)तर्फे वारस<br>८.१ ललिता लक्ष्मण पाटील<br>८.२ रविंद्र लक्ष्मण पाटील<br>८.३ संदीप लक्ष्मण पाटील |

वर नमूद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक /कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
**श्री. पराग प्रफुल्ल म्हात्रे**
ॲडव्होकेट हायकोर्ट
व नोटरी भारत सरकार
११, केशव वसंत,
जुने तहसील कार्यालयासमोर,
पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.
९८३३७३८७११

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - मूद्र खुर्द, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे न | प्लॉट नं. | क्षेत्र आर चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मे. साईराज इंटरप्रायजेस तर्फे झुजर कालाभाई झोजवाला | २०/१/अ | ११ | २३.८६.५० | ४७-७३ |

सदरची बिनशेती मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील बिनशेती मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली बिनशेती मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. १८/०६/२०२४

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
ऑफिस पत्ता. शॉप नं.२४, मार्वल क्षिप्रा
मुद्रे खुर्द ता. कर्जत जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

निवडक

### संघ म्हणून अपयशी

**फ्लोरिडा :** बाबर आझम म्हणाला, प्रत्येकजण दुःखी आहे. आम्ही संघ म्हणून खेळलो नाही. आम्ही एका खेळाडूमुळे हरलो नाही. आम्ही एक संघ म्हणून हरलो. कर्णधारामुळे आम्ही हरलो हे तुम्ही सूचित करत आहात. आता काय बाकीच्या १० खेळाडूंच्याही जागी मीच खेळू का? संघात ११ खेळाडू आहेत आणि त्या प्रत्येकाची स्वतःची भूमिका होती. त्यामुळेच ते विश्वचषक खेळण्यासाठी येथे आले होते. मला वाटते की एक संघ म्हणून आम्ही बऱ्याच गोष्टींची योग्य प्रकारे अंमलबजावणी करू शकलो नाही.

### जिल्हास्तरीय पंच परीक्षा

**मुंबई :** शहर कबड्डी असो.च्या विद्यमाने रविवारी (दि.३०) जिल्हास्तरीय पंच परीक्षा घेण्यात येणार आहेत. या परीक्षेकरीता सोमवार (दि.२४) पासून मार्गदर्शन वर्ग घेण्यात येणार असून जिल्हा संघटनेला संलग्न असलेल्या संघाच्या ज्या सदस्यांना ही परीक्षा द्यावयाची असेल त्यांनी विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज पूर्ण भरून प्रवेश शुल्कसह शनिवार (दि.२२) पर्यंत कार्यालयात जमा करावेत. अध्यक्ष महेंद्र हळदणकर (९८६९८७८५८१) किंवा सचिव सूर्यकांत देसाई (९८६९००३२२८) यांच्याशी संपर्क साधावा.

### बाबरने टि-२० खेळू नये

**लाहोर :** टी-२० विश्वचषकामधून पहिल्या फेरीतून बाहेर पडलेल्या पाकिस्तानबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही जणांना बाबर आझमला पाकिस्तानचे कर्णधारपद सोडण्याचा सल्ला दिला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट संघाचे माजी खेळाडू के. श्रीकांत यांनी मोठे वक्तव्य केले आहे. बाबरने टी-२० क्रिकेट खेळू नये, असा कठोर सल्ला दिला आहे. टी-२० क्रिकेट सारख्या वेगवान फॉरमॅटमध्ये तुम्ही नेहमी टुक टुक करु शकत नाही, असे ही श्रीकांत म्हणाले.

### तगड्या संघांचे आवाहन

**फ्लोरिडा :** टी-२० विश्वचषकात भारतीय संघ सुपर-८ च्या पहिल्या गटात आहे. येथे भारत बांगलादेश, अफगाणिस्तान आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामने खेळणार आहे. भारत पहिला सामना २० जूनला अफगाणिस्तान, २२ जूनला बांगलादेश आणि २४ जूनला ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. रोहितच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ अफगाणिस्तान आणि बांगलादेशला अजिबात हलक्यात घेण्याचा प्रयत्न करणार नाही. अफगाणिस्तानने साखळी सामन्यांमध्ये न्यूझीलंडसारख्या मोठ्या संघाचा पराभव केला होता.

### बाबरने मोडला धोनीचा विक्रम

**फ्लोरिडा :** बाबर आझमने टी-२० विश्वचषकात कर्णधार म्हणून ५४९ धावा केल्या आहेत. त्याने अवघ्या १७ डावांत या धावा केल्या आहेत. याआधी कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम धोनीच्या नावावर होता, त्याने २९ डावात ५२९ धावा केल्या होत्या. तसेच, टी-२० विश्वचषकात कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करणारे खेळाडू बाबरसह ५२९ धावा एमएस धोनी (२९ डाव), ५२७ धावा केन विल्यमसन (१९ डाव), ३६० धावा एम. जयवर्धने (११ डाव), ३५२ धावा ग्रॅम स्मिथ (१६ डाव).

# बांगलादेशाचा सुपर आठमध्ये प्रवेश

## नेपाळवर २१ धावांनी विजय

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत बांगलादेश विरुद्ध नेपाळ संघात सोमवारी (दि.१७) सामना पार पडला. सेंट विन्सेंट येथे झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात नेपाळचा २१ धावांनी पराभव करत बांगलादेशने त्यांचे सुपर-८ मधील स्थानही निश्चित केले आहे. दरम्यान, हा सामना चालू असताना दोन्ही संघांच्या दोन खेळाडूंमध्ये वाद झाल्याचेही पाहायला मिळाले.



नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना १९.३ षटकात सर्वबाद १०६ धावा केल्या होत्या. बांगलादेशकडून एकाही फलंदाजाला २० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. त्यांच्याकडून शाकिबने सर्वाधिक १७ धावा केल्या आहेत. त्याशिवाय महमुदुलाह (१३), रिषाद हुसैन (१३), तस्किन अहमद (१२), जेकर अली (१२) आणि लिटन दास (१०) यांनी दोन आकडी धावा केल्या. नेपाळकडून गोलंदाजी करताना सोमपाल, दिपेंद्र सिंग, पौडेल आणि लामिछाने या सर्वांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

त्यानंतर १०७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळचा संघ १९.२ षटकात ८५ धावांवर सर्वबाद झाला. नेपाळकडून कुशलने सर्वाधिक २७ धावा केल्या. तसेच, दिपेंद्र सिंगने २५ धावा केल्या. असिफने १७ धावा केल्या. या तिघांव्यतिरिक्त कोणालाही दोन आकडी धावा करता आल्या नाही. बांगलादेशकडून तांझिमने सर्वाधिक ४ बळी घेतले. तसेच, मुस्तफिजूरने ३ बळी तर शाकिबने २ आणि अहमदने १ बळी घेतला. या विजयासह बांगलादेश संघानेही पुढील फेरी गाठली आहे.

### दोन खेळाडूंमध्ये शाब्दिक बाचाबाची

**बांगलादेशने नेपाळसमोर १०७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळला तांझिम हसन साकिबने सुरुवातीलाच मोठे धक्के दिले होते. त्याने तिसऱ्या षटकात पहिल्या पाच चेंडूत एकही धाव खर्च न करता दोन बळी घेतले होते. यानंतर या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलने पॉइंटच्या दिशेने शॉट खेळला. त्यावेळी रोहितने केलेला बचाव पाहून साकिबने त्याच्याकडे एक रागीट कटाक्ष टाकला. यामुळे रोहित आणि साकिब यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाल्याचे दिसले. हा वाद एकाक्षणी इतका वाढला की अन्य खेळाडूंना दोघांमध्ये पडून त्यांना दूर करावे लागले. या घटनेचा व्हिडिओ आयसीसीनेही सोशल मीडियावर शेअर केला आहे.**

## प्रशिक्षकांचा कोहलीवर विश्वास

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फलंदाज विराट कोहलीला टी-२० विश्वकरंडकातील साखळी फेरीत अपयशाला सामोरे जावे लागले आहे. त्याच्या फलंदाजी फॉर्मबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे; मात्र भारतीय संघाचे फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांनी विराट कोहली पुढल्या फेरीत चांगली फलंदाजी करील, अशी आशा व्यक्त करतानाच तो अपयशाने आणखी एकाग्र झाला आहे, असे म्हटले आहे.



यावेळी विक्रम राठोड म्हणाले, विराटला तीन सामन्यात धावा करता आल्या नाहीत. आम्हाला एक कण दडपण आलेले नाही किंवा मनात शंका निर्माण झाल्या नाहीत. विराटच्या बाबतीत मी इतकेच सांगेन की नेहमीच तो संघासाठी चमकदार कामगिरी करायला उत्सुक असतो. मला उलट एक चांगली गोष्ट दिसते आहे. विराटला थोडे अपयश आल्याने तो चांगली कामगिरी करायला अजून भुकेला झाला आहे. मला वाटते आहे की तो सुपर-आठ फेरीत धमाल कामगिरी करून दाखवेल. कारण तो कमाल मेहनत करत आहे.

## श्रीलंकेकडून नेदरलँड्सचा पराभव

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकाच्या ३८व्या सामन्यात श्रीलंकेने नेदरलँड्सचा ८३ धावांनी पराभव केला. सेंट लुसिया येथील डॅरेन सॅमी क्रिकेट मैदानावर नेदरलँड्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २० षटकांत ६ गडी गमावून २०१ धावा केल्या आणि नेदरलँडला २०२ धावांचे लक्ष्य दिले. प्रत्युत्तरात नेदरलँड्सचा संघ १६.४ षटकांत सर्वबाद ११८ धावांवर आटोपला.



या विश्वचषकात २०० धावा करणारा श्रीलंका हा दुसरा संघ ठरला. यापूर्वी ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरुद्ध २०१ धावा केल्या होत्या. या दोन संघांशिवाय या विश्वचषकात अन्य कोणत्याही संघाला २०० धावांचा टप्पा गाठता आला नाही.

श्रीलंकेसाठी कुसल मेंडिस आणि चारिथ असलंका यांनी ४६ धावांची खेळी खेळली. धनंजय डी सिल्वाने ३४ आणि अँजेलो मॅथ्यूजने नाबाद ३० धावा केल्या. वानिंदू हसरंगाने अखेरच्या डावात ६ चेंडूत २० धावांची नाबाद खेळी केली. नेदरलँडकडून लोगान व्हॅन बीकने दोन बळी घेतले. टीम प्रिंगल, व्हिव्हियन किंगमा, पॉल व्हॅन मीकरेन आणि आर्यन दत्त यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

२०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेदरलँडच्या फलंदाजांवर मोठी धावसंख्या उभारण्याचे दडपण होते. मायकेल लेविट आणि स्कॉट एडवर्ड्स यांच्याशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी खेळता आली नाही. या दोन्ही फलंदाजांनी ३१ धावा केल्या. सायब्रँड एंजेलब्रेक्ट ११, मॅक्स ओफ्डॉडने ११ आणि आर्यन दत्तने १० धावा केल्या.

या विजयासह श्रीलंका 'ड' गटात ३ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. नेदरलँडचा संघ २ गुणांसह चौथ्या स्थानावर असून नेपाळ संघ १ गुणांसह ५व्या स्थानावर आहे. याशिवाय दक्षिण आफ्रिका ८ गुणांसह पहिल्या स्थानावर असून बांगलादेश ६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

## स्पर्धात्मक निवड चाचणीचा संकल्प

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या नवनिर्वाचित कार्यकारणी कमिटीची पहिली सभा पेण येतील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे पार पडली. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणीने पदभार यावेळी स्वीकारला. जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव प्रदिप नाईक यांनी नवीन कार्यकारणी सदस्यांचे स्वागत करून पुढील क्रिकेट हंगामात होणाऱ्या सर्व वयोगटातील खेळाडूंच्या स्पर्धा, कॅम्पस्, पंच शिबीर, निवड चाचणी बाबत माहिती दिली.

यावेळी अनिरुद्ध पाटील यांनी तयार केलेल्या व्हिजन डॉक्युमेंटचा भाग म्हणून ऑक्टोबर २०२४ पासून सर्व वयोगटातील मुला-मुलींच्या संघाची निवड हि स्पर्धात्मक स्वरूपात घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील सर्व अकॅडमीच्या संघांना स्पर्धेमध्ये सहभाग देऊन संघ निवडतांना प्रत्येक खेळाडूच्या स्पर्धेतील कामगिरीला महत्त्व दिले जाणार आहे. क्रिकेट क्षेत्रातील तज्ञ लोकांची निवड चाचणीसाठी कमिटीची ह्यासाठी लवकरच तयार करण्यात येणार आहे व त्याची माहीती प्रसार माध्यमांना व संबंधितांना देण्यात येईल.

स्पर्धांसाठी जिल्ह्यातील मैदाने उपलब्ध व्हावी यासाठी कमिटी प्रयत्न करणार असून जिल्ह्यातील सर्व अकॅडमी, क्लब संघांना बरोबर घेऊन सर्व कार्यक्रम लवकरच कळविण्यात येईल असे, आरडीसीएचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदिप नाईक यांनी प्रसार माध्यमांना सांगितले.

## आयर्लंडने पाकला अखेरपर्यंत झुंजवले

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

भारत आणि अमेरिकेविरुद्ध पराभव स्वीकारल्यानंतर पावसाचा फटका बसल्याने पाकिस्तानचा यंदाच्या टी-२० विश्वचषकामधील आव्हान संपुष्टात आले आहे. पाकिस्तानने अखेरच्या सामन्यात आयर्लंडला तीन गडी राखून पराभूत केले. मात्र, पाकिस्तानच्या संघाला विजयासाठी संघर्ष करावा लागला. आयर्लंड पाकिस्तानला पराभूत करते की काय अशी स्थिती एकवेळ निर्माण झाली होती. मात्र, पाकिस्तानने पुनरागमन केले आणि विजय मिळवला. अखेर शाहीन शाह आफ्रिदीने दोन षटकार मारत संघाला विजय मिळवून दिला. या विजयासाठी पाकिस्तानने संघर्ष केला. आयर्लंडने पाकिस्तानला कडवी लढत दिली.



आयर्लंडच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी कताना पाकिस्तानच्या गोलंदाजांनी सुरुवातीला धक्के दिले. आयर्लंडच्या पहिल्या पाच विकेट २८ धावांवर पडल्या होत्या. डॉकरेल, अडायर, लिटल यांच्या खेळीच्या जोरावर आयरलँडने २० षटकांमध्ये ९ गडी गमावत १०६ धावांपर्यंत मजल मारली. शाहीन शाह आफ्रिदीने तीन बळी घेत आयरलँडला धक्के दिले.

पाकिस्तानकडून रिझवान, अयुब या दोघंनी चांगली सुरुवात करुन दिली. दोघांनी प्रत्येकी १७ धावा केल्या. तर, बाबरने ३२ धावा केल्या. तर, फकर झमान, उस्मान खान, शादाब खान, इमाद वसीम यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही. हे खेळाडू अपयशी ठरले. अब्बास अफ्रिदीच्या १७ धावा आणि शाहीन शाह आफ्रिदी याच्या १३ धावांच्या जोरावर पाकिस्तानने विजय मिळवला.

## बियर ग्रिल्सच्या हाती बॅट

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

लोकप्रिय टीव्ही मालिका 'मॅन वर्सेस वाइल्ड'ने जगभर प्रसिद्ध झालेला ब्रिटनचा सर्व्हायव्हल एक्सपर्ट 'बियर ग्रिल्स' नुकताच क्रिकेटच्या मैदानावर दिसला. लोकांना सर्व्हायव्हल टिप्स देणारा बियर चक्क क्रिकेटच्या मैदानावर फलंदाजी करताना दिसला.




वास्तविक, बियर ग्रिल्स एका खास उद्देशाने क्रिकेट खेळण्यासाठी आला होता. तो 'रुथ स्ट्रॉस फाऊंडेशन'ला प्रोत्साहन देण्यासाठी क्रिकेटच्या मैदानावर उतरला होता. इंग्लंड क्रिकेट संघाचा माजी कर्णधार अँड्र्यू स्ट्रॉस याचे हे फाऊंडेशन आहे. बियर ग्रिल्स जेव्हा मैदानावर आला, तेव्हा तो फलंदाजी करू शकेल याची कोणालाच खात्री नव्हती. मात्र, त्याने शानदार फलंदाजी करत मोठमोठे फटके मारले. तो स्ट्रॉससोबत फलंदाजीला आला होता.

स्ट्रॉसचे 'रुथ स्ट्रॉस फाउंडेशन' फुफ्फुसाच्या कर्करोगाने पीडित रुग्णांना मदत करण्यासाठी काम करते. स्ट्रॉस यांने २०१८ मध्ये ही संस्था सुरू केली होती. २०१८ मध्ये त्याची पत्नी रुथ हिचा फुफ्फुसाच्या कर्करोगाने मृत्यू झाला होता. त्यानंतर त्याने या संस्थेची स्थापना केली.

## अंकिता भकतचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**। अंतल्या । वृत्तसंस्था ।**

अंकिता भकतने फिलीपिन्सच्या गॅब्रिएल मोनिका बिदौरचा पराभव करून अंतिम ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. यासोबतच ती पुढील महिन्यात होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी महिला गटात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.



नवव्या मानांकित अंकिताने उपउपांत्यपूर्व फेरीत ४०व्या मानांकित गेब्रियलवर ६-० (२६-२३, २८-२२,२८-२३)असाविजयमिळवला. तत्पूर्वी, अंकिताने इस्रायलच्या शेली हिल्टनचा ६-४ (२४-२६, २५-२५, २८-२०, २५-२५, २७-२५) आणि मिकाएला मोसेसचा ७-३ (२८-२५, २५-२७, २७-२७) असा पराभव केला. २८-२५, २६-२५) आणि अंतिम १६ मध्ये स्थान मिळवले.

दुसरीकडे, भारताची तिसरी मानांकित महिला तिरंदाज भजन कौर हिने रविवारी देदीप्यमान कामगिरी केली. तिने जागतिक पॅरिस ऑलिंपिक पात्रता फेरीतील महिलांच्या रिकर्व्ह वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक पटकावले. याचसोबत तिने भारताला ऑलिंपिक कोटाही मिळवून दिला आहे. भजन कौर हिने अंतिम फेरीच्या लढतीत इराणच्या मोबिना फल्लाह हिच्यावर ६-२ असा विजय संपादन केला.

त्यामुळे भारताला वैयक्तिक प्रकारात कोटा मिळवता आला.

### दीपिकाला कोटा मिळाला नाही

**तत्पूर्वी, भारताची अव्वल महिला तिरंदाज दीपिका कुमारीला प्राथमिक फेरीत अझरबैजानच्या यायागुल रमाझानोव्हाकडून लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. द्वितीय मानांकित दीपिकाचा अझरबैजानच्या तिरंदाजाने ६-४ (२६-२८, २५-२७, २३-२६, २४-२५, २७-२९) असा पराभव केला.**

## कफलिनचा धक्कादायक झेल



**। लंडन । वृत्तसंस्था ।**

अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये सुरु असलेल्या टी-२० विश्वचषकादरम्यान इंग्लंडमध्ये टी-२० ब्लास्ट स्पर्धा खेळली जात आहे. टी-२० ब्लास्टमध्ये खेळल्या गेलेल्या डरहम विरुद्ध लँकशायर सामन्यात पॉल कफलिन गोलंदाजी करत होता, तर फलंदाज मॅथ्यू हर्स्ट स्ट्राईकवर होता. त्याने कफलिनच्या चेंडूवर समोरच्या दिशेने जोरात फटका मारला. चेंडू सरळ कफलिच्या दिशेने येत होता, ज्यापासून वाचण्यासाठी त्याने हात वर केला. कफलिनने जसा हात वर केला, तसा चेंडू त्याच्या हातात येऊन अडकला आणि फलंदाज झेलबाद झाला. कफलिनचा हा धक्कादायक झेल पाहून स्टेडियममधील सर्वच जण हैराण झाले होते. समालोचकांचाही यावर विश्वास बसत नव्हता.

युरो करंडक फुटबॉल स्पर्धा

# इटलीचा निसटता विजय

**। डॉर्टमंड । वृत्तसंस्था ।**

सामना सुरू झाल्यानंतर २३व्या सेकंदास गोल स्वीकारल्यानंतर गतविजेता इटलीचा संघ वेळीच सावरला आणि त्यांनी युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या 'ब' गटात अल्बानियावर २-१ असा निसटता विजय संपादन केला. युरो करंडकच्या इतिहासात मुख्य फेरीत सर्वांत वेगवान गोल नोंदविण्याचा विक्रम अल्बानियाच्या नेदीम बाजरामी याच्या नावे नोंदीत झाला.



११व्या मिनिटाला अलेस्सांड्रो याने दोन वेळच्या विजेत्यांना बरोबरी साधून दिली. नंतर १६व्या मिनिटाला बारेल्ला याने केलेला गोल इटलीसाठी निर्णायक ठरला. इंज्युरी टाइममध्ये इटलीचा गोलरक्षक डोन्नारुम्मा हा रे मानाज याच्या फटक्यासमोर पूर्णतः चकला होता; परंतु चेंडू दिशाहीन ठरल्यामुळे अल्बानियाला बरोबरी साधता आली नाही.

### सामन्याची स्वप्नवत सुरुवात

**युरो करंडकच्या मुख्य फेरीत दुसऱ्यांदा खेळणाऱ्या अल्वानियासाठी सुरुवात स्वप्नवत ठरली. इटलीचा लेफ्ट-बॅक फेडेरिको डिमार्को याच्या थ्रो-ईनचा नेम चुकला आणि त्याचा लाभ बाजरामी याने उठविला. अल्बानियाच्या खेळाडूने सणसणीत फटक्यावर इटलीच्या गोलरक्षकाला हतबल ठरविले. इटलीचा संघ जास्त वेळ पिछाडीवर राहिला नाही. गोल स्वीकारल्यानंतर दहा मिनिटांनी लॉरेन्झो पेल्लेग्रिनी याच्या शानदार क्रॉस पासवर बास्टोनीचे हेडिंग भेदक ठरल्याने अल्बानियाची आघाडी भेदली गेली. बारेला याने पेनल्टी बॉक्सच्या किंचित बाहेरून मारलेल्या फटक्यावर इटलीला सामन्यात आघाडी मिळवून दिली.**

### स्पेन, इटलीचे प्रत्येकी तीन गुण

**स्पर्धेच्या 'ब' गटात आता स्पेन व इटली यांचे प्रत्येकी तीन गुण झाले आहेत. अगोदरच्या लढतीत तीन वेळच्या विजेत्या स्पेनने क्रोएशियाचा ३-० असा धुव्वा उडविला. या गटातील पुढील लढतीत १९ जून रोजी क्रोएशिया व अल्बानिया यांच्यात, तर २१ जून रोजी स्पेन व इटली यांच्यात लढत होईल.**

## नेदरलँड्सची डच संघावर मात

**। हॅम्बर्ग । वृत्तसंस्था ।**

बदली खेळाडू (सुपर सब) वाऊट वेहॉर्स्टने सामन्यातील सात मिनिटे असताना केलेल्या शानदार गोलच्या बळावर माजी विजेत्या नेदरलँड्सने युरो करंडक फुटबॉल स्पर्धेत विजयाचे पूर्ण तीन गुण प्राप्त केले. 'ड' गटातील या लढतीत त्यांनी पोलंडवर पिछाडीवरून २-१ फरकाने मात केली.



प्रशिक्षक रोनाल्ड कोएमन यांनी सामन्याच्या ८१व्या मिनिटाला वेहॉर्स्ट याला मैदानात उतरविले आणि ३१ वर्षीय खेळाडूने विश्वास सार्थ ठरविताना नेदरलँड्सला ८३व्या मिनिटाला 'फर्स्ट टच'वर २-१ अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. नॅथन अके याच्याकडून मिळालेल्या चेंडूवर बदली खेळाडूने पोलंडच्या गोलरक्षकाला चकवा दिला. त्यापूर्वी, ॲडम बुक्सा याने शानदार हेडिंग साधत पोलंडला १६व्या मिनिटाला आघाडी मिळवून दिली होती.

नेदरलँड्सने २९व्या मिनिटाला बरोबरी साधली. कोडी हकबो याने पोलंडच्या बचावफळीला चकवा देत डच संघाला बरोबरी साधून दिली. यावेळी चेंडू पोलंडच्या बार्टोझ सालामॉन याला आपटून गोलनेटमध्ये गेला. 'ड' गटात आता पुढील लढतीत २१ जून रोजी पोलंडसमोर ऑस्ट्रियाचे आव्हान असेल, तर २२ जून रोजी नेदरलँड्स फ्रान्सविरुद्ध खेळेल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)